अहिराणी भाषा व संस

(अल्प परिचय)

लेखक

भा. रं. कुळकर्णी, बी. ए.

शिरपूर

कांहीं अभिप्राय.

' आजच्या हिंदूजीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष ' हें आपलें पुस्तक वाचलें. माहिती मिळविण्याकरितां आपण केलेले परिश्रम अभिनंदनीय आहेत. त्याचप्रमाणें जमवलेल्या माहितीवरून काढलेली अनुमानें अत्यंत महत्वाची व सूचक आहेत.………आपल्या संशोधनानें आजच्या हिंदुसमाजाच्या घटनेच्या कल्पनेंत क्रांति होण्यासारखी आहे असें मला वाटतें. आपण पत्करलेलें संशोधन क्षेत्र अपूर्व आहे ह्यांत शंका नाहीं.

बदलापूर [९।२।४०] (सही) **ना. गो. चापेकर**

……… रा. भा. र. कुळकर्णी हे एक कुशाग्रबुद्धीचे संशोधक प्रथमच पुढें आलेले पहाता मला पूर्वी सातार्‍यास राहून संशोधनाचें कार्य करीत असलेल्या आचार्य कालगावकरांची आठवण झाली. रा. कुळकर्णी यांनीं भाषाशास्त्राचा नवीनच प्रदेश आखून घेऊन त्यांत आपल्या बुद्धीचे सामर्थ्य दाखविण्यास सुरवात केलेली पाहून मोठें कौतुक वाटतें. त्यांची प्रत्येक कल्पना मार्मिक व विचारप्रवर्तक आहे इ.

मु. पो. कामशेत ता. २९।१२।३८ (सही) **गो. स. सरदेसाई**

………त्या दिवशीं गरुडस्तंभाच्या उत्तर ध्रुवीय उपपत्तीबद्दल एक लहान निबंध वाचला त्यांत त्यांची संशोधक बुद्धी चांगली दिसून आली. त्यानंतर त्यांनी पंचकावरील निबंध दाखविला. त्यांतहि या चालीचे मूळ उत्तरध्रुवीय इतिहासांत आहे हें सप्रमाण सिद्ध केलेलें दिसलें. हें त्यांचें कार्य मोठें कौतुक करण्यासारखें असून

मु. धुळें मार्गशीर्ष वा॥ १३ शके १८६१

(सही) शंकर रामचंद्र राजवाडे, आहिताग्नि

No 30 of 1942/43 Bdo - 19/9/42
3404

अहिराणी भाषा व संस्कृति

(अल्प परिचय)

लेखक

भा. रं. कुळकर्णी, बी. ए.

सभासद, राजवाडे संशोधन मंडळ, धुळें;
आजच्या हिंदूजीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष.
वेदांगज्योतिषांतील लग्नविचार, खानदेश
म्हणजे स्कंददेश. इ. पुस्तकांचे लेखक.

प्रकाशक

दि. बा. वाघमारे शिरपूर,

किंमत ८ आणे

357
350

हें पुस्तक दि. बा. वाघमारे यांनीं आपल्या
'श्रीरघुवीर' छापखान्यांत छापून शिरपूर
येथें प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पहिली १९४२

या पुस्तकाचें पुनर्मुद्रण, भाषांतर वगैरे सर्व अधिकार
लेखकानें राखून ठेविले आहेत.

प्रस्तावना.

संयुक्त खानदेश साहित्य संमेलन (अमळनेर १९४१) च्या कार्यवाहांनीं मी अहिराणी भाषेवर एक निबंध लिहून तो संमेलनापुढें वाचावा अशी सूचना केली. त्या सूचनेंप्रमाणें मी एक निबंध तयार करून तो संमेलनांत वाचला. कागदाच्या महागाईमुळें इच्छा असूनही त्यांना तो संपूर्णपणें अहवालांत घेता आला नाहीं. तथापि तो मी स्वतंत्रपणें प्रकाशित करावा असा बऱ्याच मंडळींचा आग्रह झाला. यापूर्वी मी इतर विषयांच्या अनुषंगानें अहिरणी भाषेबद्दल कांहीं विचार राजवाडे मंडळाच्या 'संशोधक' त्रैमासिकांत तसेंच काहीं टाचणांच्या रूपानें 'प्रबोधांत' प्रकट केले होते व या भाषेंतील म्हणी व ध्रुव-वस्तीविषयक पुरावे अशा स्वरूपाचीं दोन व्याख्यानेंहि मंडळांत दिली होतीं. परंतु हा केवळ या विषयावरचा माझा अभ्यास कसा काय चालला आहे, हें अजमावण्याच्या हेतूनेंच.

अहिराणी भाषेचें साहित्य-शेकडों म्हणी व गाणीं असें मी जमविलें असून त्या भाषेंतील शब्द वैशिष्ट्याचा तौलनिक व सूक्ष्म अभ्यास करून तसेंच त्या संस्कृतीचाही विस्तृत व तौलनिक आढावा घेऊन तो जगापुढें मांडावा अशी माझी महत्वाकांक्षा आहे. या कार्याला कित्येक तपांचे परिश्रम लागतात याचीहि मला पूर्ण जाणीव आहे.

परंतु मधेंच असा हा छोटा प्रबंध त्या विषयावर प्रका- शित होण्यामुळें मला माझ्या विचारप्रणालीचे पडसाद अनुभवता येऊन योग्य तो लाभ त्यामुळें घेता येणें शक्य होणारें आहे

अहिराणी भाषा व संस्कृति याबद्दल पूर्वीच्या संशोधकांनीं खालीलप्रमाणें निष्कर्ष काढलें आहेत आणि या भाषेच्या व संस्कृतीच्या अंतर्गत साहित्याच्या अभ्या- सानें मी फक्त त्यांत अल्पशी भर घालण्यापलीकडे कांहीं अधीक करीत नाहीं, हें दिसून येईल.

(१) 'आभीर भारतवर्षाच्या बाहेरून कोणत्या विशिष्ट देशांतून आले, हें कोण्याहि संशोधकानें अद्याप निश्चयानें ठरविलें नाहीं .... अहीर हे जातिसंस्थ लोक म्हणून इतिहासांत प्रथम दृष्टयुत्पत्तीस येतात, आणि तसे ते आजहि परंपरेनें जातिसंस्थच आहेत. त्याचे धर्म व देवधर्म आर्यांच्या प्रमाणें पूर्वी होते व सध्या आहेत.' (राजवाडे; महाराष्ट्राचा वसाहत काल पान १३७)

(२) 'चंद्रवंशी यादव गोपांची मूळ इलावर्षी भाषा आज ५ हजार वर्षें निरनिराळ्या प्राचीन व आर्वा- चीन भाषांशीं मिश्र होत होत आज खानदेशांत जिला आभिरी किंवा अभिराणीं म्हणतात त्या स्वरुपास आली असावी.' तसेंच 'आजची अभिराणी शक २०० च्या सुमारास म्हणजे मराठीच्याहि पूर्वी खानदेश व नाशीक

या प्रांतांत उत्पन्न झाली.' [चांदोरकर, खानदेश व खानदेशी भाषा, भा. इ. सं. त्रैमासिक वर्ष ७ पान १७४]

राजवाडे संशोधन मंडळ धुळें या संस्थेचा मी एक स्वयंसेवक सभासद असून माझ्या सर्व संशोधनात्मक प्रयत्नांचा यथाशक्य ग्रंथसाहित्य, तसेंच चर्चेला क्षेत्र आणि प्रकाशनाला प्रोत्साहन व संधी असा सर्वतोपरी आधार ही संस्था आणि तिचे बहिश्चर प्राण श्री. तात्यासाहेब भट यांचा आहे. त्याप्रमाणेंच शिरपूर येथील श्री. बाळाजी परशराम जोशी व श्री. जनार्दन वामन जोशी यांच्या ग्रंथसंग्रहाचाही मला त्यांच्या सौजन्यानें उपयोग झाला हें सादर नमूद करीत आहे.

माझ्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनंतर व हे पुस्तक प्रकट होई पर्यंतच्या काळांत कांहीं थोर संशोधक व विद्वान सद्गृस्थांशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिचय होण्याचा योग आला त्यावेळीं सर्वांनीं माझ्या अल्पस्वरूप कृतीचा गुण ग्राहकतेनें आणि थोरमनानें परामर्ष घेतला याबद्दल सर्वांचा मी ऋणी आहे.

तसेंच के. इतिहासाचार्य राजवाडे, कै. डॉ. केतकर व श्री. पां. मा. चांदोरकर यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासानेंच मला या विषयांत गति दिली हें नम्रपणें लिहीत आहे.

संशोधनात्मक प्रकाशन पैसा देत नाहीं ही जाणीव असूनहि श्री. वाघमारे यांनी या छोट्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचें प्रकाशन शिरावर घेऊन ते पूर्ण केलें यांत त्यांचें खानदेशावरील प्रेमच व्यक्त होत आहे.

या पुस्तकांत शुद्धलेखन आणि मुद्रण दोष बरेंच राहिले आहेत परंतु त्यांचा प्रतिपाद्य विषयावर परिणाम होणार नाहीं अशी आशा आहे.

शिरपूर
२३-८-४२ | भा. रं. कुळकर्णी



श्री. रुपचंद हरचंद शेठ हे शिरपूर येथील तरुण उत्साही व्यापारी गृरस्थ काँग्रेसच्या अधिकार ग्रहणाच्या काळांत काँग्रेसचे उमेदवार म्हणून शिरपूर म्युनिसिपालिटींत निवडून येऊन स्कूल चेअरमनचें काम करीत असता त्यावेळीं त्याचें लक्ष माझ्या संशोधनाकडे प्रथम वळलें. माझे अहिराणी भाषेबद्दलचे संशोधन जगापुढें यावें असा त्यांचा तेव्हां पासूनचा आग्रह आज या पुस्तकाचें रुपानें पूर्ण होत. त्यांचें सक्रिय प्रोत्साहन आणि कळकळ याबद्दल मी फार आभारी आहे.

—लेखक

अहिराणी भाषा व संस्कृति
पूर्वार्ध

१ भाषा आणि इतिहासः—

भाषेचा इतिहासाशीं दोन प्रकारें संबंध येतो. त्यांतील पहिला ह्मणजे कुठलाही इतिहास भाषेच्या द्वारेंच प्रकट होतो हा. या दृष्टीनें पाहिलें तर मानवी जीवनाच्या सर्व शाखोपशाखांना प्रकट करण्याचें श्रेय भाषेलाच असतें आणि ह्मणून भाषेचा इतिहासाशी या दृष्टीनें येणारा संबंध कांहीं विशेष असतो असें ह्मणता येणार नाहीं.

परंतु या पेक्षां आणखी एका विशेष दृष्टीनें भाषेचा इतिहासाशी संबंध येतो. तो ह्मणजे भाषा ही इतिहासगर्भ असते (Language is fossil History). मानवी ज्ञानाच्या कक्षेंत येणाऱ्या जडजीव सृष्टीच्या घडामोडीचा ठसा नकळत भाषेवर उमटतो आणि भूत काळावर प्रकाश पाडणारीं बखरी, वंशावळ्या ताम्रपत्रें शिलालेख नाणीं जेव्हां मिळेनाशीं होतात तेव्हां एकटी भाषाच इतिहास संशोधकांना बहुमोल वाटूं लागते.

मूलगृहकाल (Indo European age) पर्शूभारतीय काल (Indo Iranian age) आणि वेदकाल (Indo Aryan age) या तीन

प्राचीनतम कालखंडांचा परिचय करून देऊन आज भूपृष्टावर नानाजातींच्या रूपानें नांदणाऱ्या इंग्रजी, स्कँडेनेव्हियन्, जर्मन, ग्रीक, पर्शीयन, भारतीय इत्यादि सकृद्दर्शनी भिन्नभिन्न वाटणाऱ्या लोकांच्या भाषा, रितीरिवाज, व देवकल्पना यांत भूतभूत ऐक्य असल्याचा क्रांतिकारक आणि चमत्कृतिजनक शोध केवळ त्या त्या लोकांच्या भाषांत बीजरूपानें आढळून आलेल्या इतिहासाचेंच फळ आहे; हें भाषेच्या इतिहास-गर्भतेचें सर्वांत मोठें उदाहरण होय.

२ अहिराणींतील वाङमयः—

आभीर या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या जातींची तशीच परिस्थिती आहे. आभीर नांवाचे राज्यकर्ते खानदेशांत व जवळपास राज्य करत असल्याचें इ. स. च्या ३।४ शतकापासून तो १३ व्या शतकापर्यंतचे ह्मणजे सुमारें हजार आठशें वर्षांचें जरी दाखले मिळत असले तरी त्यांच्या भाषेंतील वाङ्मय ह्मणी, गाणीं, व गोष्टी यापेक्षां पुढें जाऊं शकलें नाहीं. आणि जें कांहीं या रूपानें त्यांत वेळोंवेळीं निर्माण होत गेलें व परंपरेनें येत गेले तें ग्रथित तर कधींच झाले नाहीं. केवळ कठंस्थच होतें आणि आजही आहे.

याचें कारण उघड आहे. भाषेचा संसार सन्माना-

स्पद व्हायला ती भाषा बोलणाऱ्यांच्या दरबाराचा दराश आणि वैभव वाढावें लागतें. अहिराणी वंशाच्या राजांची सत्ता अगदींच मांडलीकांच्या तोलाची असल्या कारणानें त्यांच्या दरबारांत झालें तर त्यांच्या सम्राटांच्याच भाषेचें प्रस्थ माजलें असून त्यांच्या मायबोलींची गळचेपी झाली असावी. आजही हिंदुस्थानांतील अनेक संस्थानिकांच्या दरबारांत इंग्रजीचें जें अनवश्यक आणि आतोनात खूळ माजलें आहे याचें कारण काय! आणि ह्मणूनच अहिराणी लोकांचा इतिहास लिहू ह्मणणारांस इतर भाषांतील शिलालेखांत व ताम्रपत्रादि साधनांत आलेल्या अहिरराजांच्या उल्लेखा व्यतिरिक्त कांहीं अन्य माहिती मिळू शकत नाहीं. अर्थात अहिरांचा इतिहास लिहावयाचाच किंवा त्यांच्या भूतकाळावर कांहीं प्रकाश पाडावयाचाच तर त्यांच्या इतिहासाचें एक मात्र साधन जें त्यांची भाषा आणि त्यांचे रितिरिवाज यांचीच कसूण तपासणी करणें क्रम प्राप्त होतें.

३ प्राचीन परंपराः—

सामान्यतः कोणतीही बोलभाषा ती बोलणाऱ्या जातीच्या नांवानें किंवा लोकांच्या नांवानें ओळखली जाते. आणि त्या लोकांच्या प्राचीनतम उल्लेखा इतकी तर त्या भाषेची प्राचीनता असतेच यांत संदेह नाहीं.

फरक इतकाच कीं, आज ज्या स्वरुपांत ती भाषा आपणापुढें आहे त्याच स्वरुपांत ती होती असें ह्मणतां येणार नाहीं. परंतु त्या नांवानें ती त्या काळींही ओळखली जात असावी हा निष्कर्ष चुकणार नाहीं. या दृष्टीनें अभिरांचा प्राचीनतम स्पष्ट उल्लेख महाभारतांत[१] आहे. आणि महाभारताचा काळ शकपूर्व सुमारें १८०० वर्षें आहे. ह्मणजे आज जवळ जवळ ३६०० वर्षें अहिर जाती व ती बरोबर तिची भाषा स्वतंत्रपणें अस्तित्वांत असलेली दिसतें. या बाबतींत किती प्रचलीत भाषा तिची स्पर्धा करूं शकतील हा प्रश्न आहे.

कै. वि. का. राजवाडे व डॉ. केतकर या दोन विद्वान संशोधकांनी भारतीय भाषा आणि संस्कृति यांच्या बद्दल पचलीत असणाऱ्या समजुतींना आमूलाग्र बदलून टाकणारें नवे सिद्धांत साधार जगापुढें मांडण्याचें श्रेय घेतलें आहे. कै० राजवाड्यांच्या मतें भारतांत सांप्रत प्रचलित असणाऱ्या भाषांत पूर्ववैदिक शब्द आढळून येतात. डॉ. केतकरांच्या मतें वेदवाङ्मयाची जोपासना करणाऱ्या आर्यशाखेच्या पूर्वीं त्यांच्याशीं भाषा

---

(१) बाल्हिका वाटधानाश्च आभीराः कालतोयकाः
अपरांता परांताश्च पंचालाश्चर्म मंडलाः ॥४७॥
अध्याय ९ भीष्मपर्व महाभारत.

व संस्कृतीनें साम्य असणाऱ्या आर्यांची भारतात वसाहत झाली होती. हे दोन्हीं सिद्धांत भिन्न संशोधकांचें असल्यानें तर त्यांचें महत्व फार आहे. आणि यामुळें अहिराणी भाषा व संस्कृतीची परंपरा दूरवर जाण्याचा संभव आहे.

आभीर भाषा या स्वरुपाचा वररुचीच्या व्याकरणांत उल्लेख आहे आभीरीं भाषेची गणना त्यानें अंपभ्रंश भाषांत केलेली आहे आणि आजही अहिराणी भाषेबद्दल जगाची तीच कल्पना आहे.

आभीर असा विभाषा ह्मणून प्राचीनतम उल्लेख भरत मुनीच्या **भारतीय नाट्यशास्त्रांत** आहे. भरत मुनीच्या नाट्यशास्त्रांत महाराष्ट्री भाषेचा मात्र उल्लेख नाहीं. परंतु पुढें तीच महाराष्ट्री भाषा श्रेष्ठ प्राकृत ह्मणून गणली जाऊ लागली. ह्मणजे भरत काली इ. स. पूर्व १।२ शतकांत महाराष्ट्रीला **नामोल्लेख** करण्याइतके सुद्धां वैशिष्ट्य नव्हते. तेव्हां विभाषा ह्मणजे बोली **अशिष्ट भाषा**) या रुपानें अभीर भाषा आस्तित्वांत होती. आणि अशा वेळीं मराठीचा तर जन्मही नव्हता.

महाराष्ट्री या प्राकृत भाषेचा प्रथम उपयोग मृच्छकटिक नाटकांत झालेला आहे त्याचा लेखक शूद्रक हा पैठणचा अभीर राजा शिवदत्त असावा असें मत डॉ. केतकरांनीं व्यक्त केलें आहे. (ज्ञान कोश न. ८०, १०७, १११ पहा.)

हेमचंद्रकृत देशीनाममाला श्लोक ४ टीका यांत 'देशविशेष महाराष्ट्र विदर्भाभिरादयस्तेषु प्रसिद्धा' असा (हेमचंद्रकाल सं. १२ वी शताब्दी) उल्लेख आहे. आणि हा अगदीं यादवांच्या काळचा उल्लेख आहे. ह्मणजे इसवी सनापूर्वी १।२ शतक ते इ. स. चे ११।१२ शतकापर्यंत भाषापंडितांस अहिराणी ही आभिर या नांवानें माहीत होती इतकेंच नव्हे तर हेमचंद्र महाराष्ट्र विदर्भाच्या जवळ आभिर देश ह्मणतो तो प्रस्तुतचा खानदेश याबद्दल संशय नाहीं. भंभागिरी ह्मणजे पश्चिम खानदेशांतील साक्री तालुक्यांत निजामपूर जवळ भामेरचा प्राचीन डोंगरी किल्ला आहे. तेथील अभिरराज लक्ष्मीदेवाचा पाडाव सिंघण यादवाच्या खोलेश्वर सेनापतीनें केल्याचा शिलालेख उपलब्ध आहे. (हेमाद्रि चरित्र परिशिष्ट पान ५७ कलम ३० सिंघण इ. १२१०–१२४०)

४ खानदेश आणि व्रजप्रदेशः—

महाराष्ट्राच्या वसाहतीच्या दृष्टीनें पाहिलें तर गंगायमुनेच्या खोऱ्यांतील लोकांनीं येथें येऊन वसती केली हें निर्विवाद दिसतें. त्यांतल्या त्यांत गंगा, गोमती, गोवर्धन इत्यादि विशिष्ट नद्या व पर्वत नामांची द्विरुक्ती ही तर आज जो प्रदेश व्रज ह्मणून ओळखला जातो त्यांची नाशिकचा भाग पुनरावृत्ती असावी असें वाटतें.

भागीरथी गंगेची पुण्यमय स्मृति उराशी बाळ--गणाऱ्यांनीं आपल्या वसाहतीच्या विस्तारांत बाणगंगा, रामगंगा, पाताळगंगा, बेलगंगा या सारख्या शेंकडों गंगा भारतांत निर्माण केल्या पण त्याच्यांत गोदावरी, गंगा ही पुराणांतही श्रेष्टत्व पावली. पौर्वापर्याच्या दृष्टीनें विचार केला तर भागरथीगंगा आणि गोदावरीगंगा या यॉर्क न्यूयॉर्क प्रमाणें कार्य कारण भावानें संबद्ध झालेल्या दिसतात. गोकुळ वृंदावनांतल्या कृष्णक्रीडा-स्थान अशा **गोवर्धन** पर्वताचीही प्रतिकृति किंवा पुण्य-स्मृति ह्मणून नाशकाजवळ प्राचीन काळीं एक **गोवर्धन पर्वत** व **खेडें** नांवाजलें होतें. गोमती नदी त्र्यंबकेश्वरा-शेजारी आहे. खानदेशांतही आहे आणि खानदेशांतील गोमती त्र्यंबकेश्वराप्रमाणें **सिंहस्थाच्या** पर्वासाठीं प्रसिद्ध आहे. प्रकाशाचा सिंहस्थ मेळा तेथें तापी असतांनाही गोमतीवर भरतो ही गोष्ट विशेष आहे.

या वरून खानदेशांत व्रज प्रदेशाचेच रहिवाशी येऊन राहिल्याचा दुसरा आणखी मोठा पुरावा दिवा--ळीच्या सणांत घरोघर तयार होणारे शेणाचे **गोकुळ** होय. प्राचीनतम गवळी वाड्याची ती गोमयातून केलेली प्रचलित प्रतिकृति क्षणभर इतिहासज्ञ प्रेक्षकाचें मन आकर्षित केल्या वाचून रहात नाहीं.

शेणाचींच गुरें, शेणाचेच गवळी, कुणी तळ्यावर गुरांना पाणी पाजतात. शेणाच्याच गवळणी शेणाचीच जातीं, पाटा, वरवंटा, चूल, माठडेरा, कोणी दळतात, कांडतात, घुसळतात, सैंपाक करतात

हें सर्व, सामान्यगृहिणीच्या हातून घरोघर निर्माण होणारें दृश्य पाहतांना दंग झालेल्या मनाला, त्यांतील दळण्याची घरघर, ती दळणाऱ्या गवळणीचे गाण्याचे सूर, घुसळण्याचा दधिमंथन घोष, त्यांच्या आजुबाजूला बागडणाऱ्या पोरांचे किलबिलाट, गाईचा हंबरडा, वास - रांचे शब्द, त्यांना आटोक्यांत ठेवण्यासाठीं धावपळ कर- णाऱ्या गवळ्यांच्या आरोळ्या, तळ्याच्या कांठीं होणारा कोलाहल आणि या सर्वांवर कळस ह्मणजे या गोपांच्या पूर्वजांना यमुनेच्या कांठीं, कदंबावर चढून, किंवा गोकूळ वृंदावनाच्या कुंजा कुजांत दडून श्रीकृष्णानें दिलेल्या दिव्यसंगीताच्या संथाच आपल्या पाव्यांतून हें घोकतात कीं काय असा क्षणमात्र भास झाल्यावाचून रहात नाहीं.

भाषा ही इतिहासगर्भ असते, (Language is fossil History) हा एक भाषा शास्त्राचा सिद्धांत सांगितला त्या प्रमाणें दुसरा एक सिद्धांत असा कीं, शब्द हे विसरलेल्या उपमा (रुपकें) होत. (Words are Forgotton Metaphors)

याचा स्पष्ट अर्थ आमचे शब्द हे प्राचीनतम उपमा आहेत पण आह्मी त्यांचें उपमेय काळाच्या ओघांत विसरलों.

ही दिवाळीची गोमयाची घोष (गवळी वाड्याची) पूजा आजच्या खानदेशी अहिरांच्या प्राचीनतम पूर्वाजांनीं अनुभवलेल्या प्रत्यक्ष जीवनांची जिवंत स्मृति आहे. तिच्यांत पितृपूजा आहे; कलोपासना आहे आणि स्वत्वाची जोपासना आहे. पण कुणाला त्याची जाणीव? तें करणारांना? छे, माणसाला इतकी मागची जाणीव राहिली असती तर भाषाशास्त्र आणि इतिहासाचा खटाटोप कशाला हवा होता? असो या सकृद्दर्शनी इतिहास, आणि भाषाशास्त्राला वावडे वाटणाऱ्या काव्य कल्पना आणि भावनामय भराऱ्या आटोपून प्रत्याक्षाचाच विचार करूं या.

५ अहिराणी आणि व्रजभाषाः—

व्रजभाषेंतील कांहीं विशिष्ट शब्द आज अहिराणींत. आहेत जसें कहार (भोई) पनगट = पनघट, केवट = खेवट = खेवा (नांवेचा खेवा भरला) क्रियापदाचीं रूपें दीन्ह कीन्ह लीन्ह तुलसीदासाच्या रामयणांत व आजच्या ग्रामीण बोलीत येतात. त्यांत फरक उच्चाराचाच असतो. हिंदींत अंत्य अक्षर ऱ्हस्व तर अहि-

राणींत दीर्घ असतें. तसींच आणखी पुष्कळ साम्यें आहेत पण एक वैषम्य असें आहे कीं अहिराणींत नपुं-सकलिंग आहे हिंदींत नाहीं!

६ महाराष्ट्र साहित्य संमेलन आणि अहिराणीः-

जळगांव १९३६ च्या मराठी साहित्य संमेलना-पूर्वी अहिराणी हें मराठीचें एक गांढवळ रुप आहे कीं काय अशा प्रकारचा निर्णय करण्यासाठीं एक भाषा समिती नेमली होती. त्या अहिराणी कोंकणी भाषा समितीचा निर्णय पुढें मराठी साहित्य पत्रिकेंत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत कोंकणी हें मराठीचें एक प्रादेशिक रुप आहे असें स्पष्ट म्हटलें असून अहिराणीबद्दल मात्र तसें विधान करण्याचें टाळलें आहे. याचें कारण उघड आहे कीं अहिराणीचें मराठीला गांवढळ रुप ठरविण्या-इतका सबळ पुरावा उपरोक्त समितींतील विद्वानांना मिळाला नाहीं. परंतु त्या पूर्वी फार दूरवर विचार न करणाऱ्या व अहिराणीचें साहित्य व स्वरूप नीट न पाहिलेल्या लोकांना ती मराठीचें एक हेंगाडे रुप वाटत होती व अद्यापही वाटत आहे.

७ ग्रीअर्सनचें मतः—

आणि या पूर्वी ग्रीअर्सननें आपल्या भारतीय

भाषानिरीक्षणांत (Linguistic Survey of India) अहिराणी ही गुजराथीची एक पोटभाषा आहे असें मत नमूद केलेलें आहे. पण अतां त्या मताला मूल्य उरलें नाहीं हें निराळे सांगणें नको.

८ शुद्ध अहिराणीचें स्थानः—

खानदेश, महाराष्ट्र आणि गुजराथ यांच्या साध्यांत आहे. खानदेशांतील पश्चिमेकडील नंदुरबारचा भाग हा एकेकाळीं गुजराथेंत मोडत असे आणि नंदुरबार, तळोदे, शहादें व नवापूर या तालुक्यांत रेवा गुजर यांची वस्ती फार आहे. तेव्हां तेथील अहिराणीवर गुजराथीची छटा उमटणें अगदीं सहज आहे. इकडे पूर्व खानदेशांतील रावेर, यावल, जामनेर हे तालुके वऱ्हाडास लागून असल्यानें तसेंच दक्षिणेकडील नाशिक जिल्ह्यांतील मराठीचा संस्कार तेथील अहिराणीवर प्रचुरपणें झाला असल्यानें अहिराणी ही मराठीचा अपभ्रंश वाटण्याचा सहज संभव आहे· आणि ह्मणूनच अशा सरहद्दीवरील भाषेच्या मासल्यापेक्षां खानदेशच्या गाभ्यांतील ह्मणजे शिंदखेडें व अमळनेर या तालुक्यांतील भाषा ही सर्वांत शुद्ध स्वरुपांची आणि प्रातिनिधिक समजावी. या प्रदेशांतील साहित्य जमवूनच त्याचा विचार करण्याचा व अभ्यास करण्याचा प्रस्तुत लेखकाचा प्रयत्न आहे.

९ भाषेच्या स्वत्वाचें गमकः —

संज्ञा क्रिया विषेशणादि शब्दांची परस्पराशा संबंध येणाऱ्या भाषांतून अनिर्वंध देवाण घेवाण होते. तशांत राजकीय वर्चस्व असणाऱ्या अशा शब्दांचा भला मोठा लोंढा त्यांच्या आधीन असणाऱ्या भाषांत शिरलेला आढळून येतो. तथापि भाषेचें खरें गमक तीतील नाम व धातु प्रत्ययांवर अधिष्ठित असतें.

अहिराणीचा या दृष्टीनें विचार करणारांस ती मराठीपेक्षां अगदीं निराळीं भाषा आहे असाच निर्णय द्यावा लागेल. हें पुढील कांहीं उदाहरणावरून वाचकांचें ध्यानीं येईल.

१० अहिराणीच्या व्याकरणाचा नमुना:—

नाम प्रत्यय	ए. व.	ब. व
प्रथमा	राम	राम
द्वि.	रामले	रामेसले
तृ.	रामनी	रामेसनी
च	रामले	रामसले
पं.	रामथीन	रामेसथीन
ष.	रामना, नो, न	रामेसना, नो, न
स.	राममा	रामेसमा
सं.	राम	राम

षष्ठीचें रुप मराठींत नामाचें चा ची चे प्रत्ययानें व सर्वनामाचे कांहीं बाबतींत झा झी झे, नें होते. गुजराथींत नामाचें ना नो नुं व कांहों सर्वनामांचें तमारा, मारा, वगैरे तऱ्हेनें होते.

अहीराणींत षष्टीचा सर्वत्र ना, नी, न, आहे. आणि कांहीं सर्वनामांत त्याचा न्ह होतो. तुन्ह, मन्ह, त्यान्ह इ. विकल्पानें होतें.

अतां धातुप्रत्ययांचा नमुना पाहूं

वर्तमान कर धातू

	ए. व.	अ. व.
प्र पु.	मी करस	आम्हे करतस
द्वी. पु.	तू करस	तुम्हे करतस, करतीस (स्त्री)
तृ. पु.	तो, ती, ते करस,	त्या करतस, त्या करतीस (स्त्री)

भूत

प्र. पु.	मी करऽ	आम्हे करऽ
द्वि. पु.	तू करऽ	तुम्हे करऽ
तृ. पु.	त्यानी, तिनी, करऽ	त्यासनी तीसनी करऽ

(जाय = जाणें)

प्र. पु. मी गऊ	आम्हे गऊत
द्वी. पु. तू ग्या	तुम्हे ग्यात
तृ. पु. तो ग्या, ती गई, ते गे	त्या ग्यात

(लय = आणणें)

१ पु. मी लयनु	आम्हें ल्यनुत
२ पु. तू लयना, नी, न,	तुम्हे लयनात, न्यात (स्त्री)
३ पु. तो लयना नी, न	त्या लयनात, न्यात (स्त्री)

भविष्य (संकेत भविष्याप्रमाणेंच)

कर

ए. व	अ. व
१ पु. मी करसु	आम्हे करसुत
२ पु. तू करसी	तुम्हे करशात
३ पु. तो करी	त्या करथीन

गुजराथी किंवा मराठीशी या भाषेचें साम्य व वैषम्य ठरविण्यास इतकेंच व्याकरणही पुरेसें आहे. आणि यांत आढळणाऱ्या कांहीं साम्यावर जर अहिराणी ही गुजराथी किंवा मराठीची पोटभाषा आहे असें म्हणण्याचें कोणी धाडस केलें तर मराठी, गुजराथी, बंगाली व हिंदी यांच्यांतील साम्यावरही त्यांना एकमेकाच्या पोटभाषा ठरविण्याची पाळी येईल.

११ मराठीशी देवाण घेवाणः--

प्रस्तुतचा खानदेश हा वराहमिहिराच्या बृहत्सं- हितेंत आभीर देश ह्मणून उल्लेखित आहे. (इ. स. ५ शतक) त्या नंतरच्या कांहीं ग्रंथांत आभीर देश ह्मणून गोमांत व विंध्य यांतील प्रदेशाला संबोधिलें आहे. आणि अहिर जातीच्या लोकांचा महाराष्ट्रांत इतरत्रही प्रसार झालेला आहे. दक्षिणकडे जेजुरीकडच्या भागांत धनगरांत बारा अहिरराव ह्मणून घराणीं प्रसिद्ध आहेत. तसेंच खानदेशच्या कमी अधिक भागावर यादवादि महाराष्ट्री भाषा बोलणाऱ्याचें शतकानुशतके राज्य होतें या दृष्टीनें अहिराणींत मराठी शब्द व प्रयोग येणें सहज घडणारी गोष्ट आहे परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, प्राचीन मराठींत आज अहिराणींत असाणारे शब्द व वाक्प्रचार रुढ असल्याचें दिसून येतें.

१२ ज्ञानेश्वर पूर्वकालीन मराठींत अहिराणीचे शब्द

ज्ञानेश्वरी व महानुभावांचे ग्रंथ चाळून पाहतां त्यात मराठींत आज खानदेशींत रुढ असणारे किती तरी शब्द वाक्प्रचार उपयोगांत आणलेले दिसनात. लीला- चरित्रांत 'मोहोरिया वाघारिसी' (मोहऱ्या वघारस) ह्मणजे मोहोऱ्यांची फोडणी घालतेस, ढासले रांधिले (ढासल रांध) ढासले = बाजरीचा घाट्यासारखा पदार्थ.

घाट ऐसा दिवा पाजळत असे (घाटनी गत दिवा बळस) घाट=घंटा, घंटेप्रमाणें मोठा. ज्ञानेश्वरींत, कोनी निघता तिळका उठती इ. कोनी निघणें (कोन न्हिगस) बाळंत होणें. इत्यादि.

१३ गुजराथीशीं देवाण घेवाणः —

मराठी प्रमाणेंच गुजराथीचाही अहिराणींत सामान्य असा कांहीं विशिष्ट शब्द समुच्चय आढळून येतो. परंतु त्यांत कांहीं जागी समाज शास्त्र दृष्ट्या वैशिष्ट्य आहे हेंही पण लक्षांत आल्यावाचून रहात नाहीं.

अहिराणी	गुजराथी	संस्कृत
बठ्ठ	बध्धु	बहुथा (सर्व या अर्थी)
डीकरा, डीकरी	दीकरो, दीकरी	दारकः दारिका

यांत गुजराथी दीकरो दीकरी ह्मणजे संस्कृत दारकः दारिका ह्मणजे मुलगा आणि मुलगी प्रमाणेंच अर्थ आहे. आणि तसा उपयोग त्या शब्दांचा होतो. परंतु खान-देशांत डीकरा व डीकरी (डिक्री) याचा अर्थ पुतण्या व पुतणी असा होतो.

यांत एका प्राचीनतम सामाजिक आवस्थेचें अवशेष समाविष्ट झालेले दिसतात. चुलता ह्मणजे क्षुल्लतात. मराठींत चुलता या शब्दानें बापाच्या लहान मोठ्या भावांचा बोध होतो. परंतु संयुक्तप्रांत आणि

मारवाड सारख्या प्रदेशांत पित्याच्या वडील भावास ताऊ (तात) ह्मणण्याची परीपाठ आहे. पतीचे मोठे भाऊ मराठींत दीर असले तरी अहिराणी, मारवाडी वगैरे भाषांत त्यांना जेठ (ज्येष्ट) ह्मणतात आणि छोटेच फक्त अहिराणींत देर व हिंदीत देवर असतात.

व्हऊ (सं. वधू) हा शब्द अहिराणींत पुत्रवधू ह्मणजे सून व भ्रातृवधू, भावजई असा अर्थी उपयोगांत येतो. अमर त्याचा स्ववधू व पुत्रवधू असा द्विविध अर्थ देतो त्यांत अहिराणीचा भ्रातृवधू हा अर्थ घातला आणि जोडीला मावशी व साडू यांच्या व्युत्पत्तीकडे लक्ष दिले तर भारतीयांच्या विवाह संस्थेच्या विकासांतील एका मोठ्या टप्यावर प्रकाश पडतो.

तसेंच गुजराथीत लुगडुं म्हणजे वस्त्रमात्र परंतु मराठींत लुगडें म्हणजे स्त्रियांचें वस्त्र गुजराथी पुरुषही आपल्या वस्त्रांचा लुगड्यानें निर्देश करतो तर मराठी व अहिराणींत पुरुषी वस्त्रांचा लुगड्यांनीं निर्देश करणें म्हणजें त्या त्या पुरुषांचा उपमर्द किंवा उपहास करणें असाच अर्थ होतो.

१४ भाषाशास्त्र आणि समाजशास्त्रः—

अशा प्रकारची शब्दांचा अर्थ संकोच विस्तार अथवा विपर्यासाचीं उदाहरणें निवडून त्यांचें निरीक्षण

करणारांस भारतीय समाजाच्या विकासाचें विहाराचें आणि सांस्कृतिक देवाण घेवाणीचें किती तरी धागे दोरे उकलता येतील. आणि भारतीय समाजशास्त्राचा अभ्यास जेव्हां भारतीय भाषांचा सखोल आणि चिकित्सापूर्ण अभ्यास होईल तेव्हाच खरा म्हणण्यासारखा झाला असें म्हणता येईल. यांत अहिराणी सारख्या भाषांनाही महत्वाचें स्थान आहे.

१५ डिकरा, व्हऊ आणि भारतीय सामाजिक जीवनाचा विकासः—

लुगडें या शब्दाचा अहिराणी आणि मराठींत जो अर्थ संकोच झालेला आहे म्हणजे गुजराथींत जो शब्द स्त्री पुरुषांच्या वस्त्रांना सर्रास लावता येतो तो मराठींत फक्त स्त्रियांच्याच वस्त्रांना लावण्याचा संकुचित उपयोग कां व्हावा ? तसेंच गुजराथींत डीकरा म्हणजे मुलगा (Son) असा अर्थ असता अहिराणींत त्याचा भावाचा मुलगा म्हणजे फक्त पुतण्या असाच अर्थ कां व्हावा ?

संस्कृत वधू शब्द हा अमरानें स्ववधू आणि पुत्रवधू म्हणजे बायको व सून अशा उभय अर्थी दिला आहे. परंतु खानदेशांत या वधू शब्दाचा आणखी

तिसरा उपयोग आहे तो म्हणजे भावजय. आजहि मारवाड्यांत बहू म्हणजे पत्नी असा अर्थ होतो. या वधू शब्दाचेंच अहिराणी रुप व्हऊ आहे. आणि त्या व्हऊचा सून व भावजय अशा उभय अर्थी सर्रास उपयोग होतो. म्हणजे संस्कृत वधूचे स्त्रवधू, पुत्रवधू आणि भ्रातृवधू असे तीन अर्थ आपल्यापुढें आज प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोगांत आलेले दिसतात. यांचा साकल्यानें कांहीं निष्कर्ष काढता आला तर तों एकच काढता येणें शक्य आहे आणि तो हा कीं आजचा अहिराणी भाषा बोलणारा मानव संघ हा खानदेशांत स्वतंत्रपणें वसाहत करण्यापूर्वी एकंदर भारतीय भाषांतून असणाऱ्या शब्दांचा आजही जो उपयोग करत आहे त्यांत सामाजिक प्रगतीचा इतिहास आहे. संस्कृत दारक व दारिका हे मुलगा आणि मुलगी यासाठीं असणारे शब्द कधी तरी प्राचीन काळीं पुतण्या व पुतणीस लागू पडत असले पाहिजेत. तसेंच वधू या एकाच शब्दानें स्त्रवधू, पुत्रवधू व भातृ-वधू यांचा म्हणजे समाजांतील यच्चावत स्त्रीवर्गाचा निर्देश होत असला पाहिजे.

१६ सांधिक विवाह संस्था (Tribal Marriage)

हेंच मानवी विवाह संस्थेतील एके काळच्या ढोबळ अवस्थेचें म्हणजे सांधिक विवाह प्रणालीचे पुरावे

होत. व्यक्तींत पति पत्नि असें नातें असण्यापूर्वी तें व्यक्तिस मूहांत म्हणजे जमातींतील पुरुष वर्ग हा पति-स्थानी व त्याच जमातींतील स्त्रीया या पत्नि असण्याचे सामुदायिक संबंध एकेकाळीं होते या म्हणण्याला उप-रोक्त शब्दांचा अभ्यास पुष्टी देणारा आहे असें म्हणता येईल. कारण गणिका हा शब्द आज वेश्या अशा अर्थी उपयोगांत येत असला आणि पत्नि या शब्दाशीं जरा सुद्धां निकट केलेला गणिकेच्या बाबतींत सांप्रत खपण्यासारखी नसली तरी गणिका मुळची गणांतील म्हणजे संघातील पत्निच होय. विवाहांत वधूच्या गळ्यांत घालावयाची काळी पोत अखंड सौभाग्याच्या प्राप्तीसाठीं एकाद्या गणिकेकडून ओवून घेण्याची नष्ट-प्राय झालेली चाल काय दर्शविते? ती नवपरिणित वधू पुढें गणिकेचा वर्तमान अर्थी आदर्श ठेवित नसून गणिका ही परंपरेनें सर्व संघाची पत्नी असल्यानें ती आमरण सौभाग्यवती राहण्याची शक्यता तिच्या बाबतींत कशी होती आणि विवाहाच्या व्यक्ति विषयक मर्यादीकरणा-तही सौभाग्य आमरणअखंड असण्याची अपेक्षा अस-ल्यामुळें शुभ शकुनासाठीं या परंपरेच्या अखंड सवाष्णी-चींच कां निवड झाली हें सहजच कळण्यासारखें आहे.

या गणिकेच्या जोडीला अहिराणींत प्राचूर्यानें व

मराठीतही माहित असणारा साडू शब्दाचा विचार केला तर उपरोक्त निष्कर्षाला चांगलीच बळकटी मिळते.

साडू हा शब्द समाना उढा यस्य सः म्हणजे ज्यांची समान बायको आहे ते साडू होत. समाना उढा याचा सामान्य (Common or the same) असाच अर्थ केला पाहिजे. सांप्रत भगिनींचे पति साडू असतात. परंतु एके काळच्या सामुदायिक वैवाहिक जीवनाचा हा अवशेष आहे आणि अहिराणींत याला दुसरा एक मदतनीस शब्द आहे.

मराठींत जिला सावत्र आई म्हणतात तिला अहिराणींत मावशीमाय म्हणतात. मावशी, सावत्र आई कधीं कधीं असूं शकते. परंतु सावत्र आईला मातृस्वसा (मावशी) म्हणण्यांत किंवा तिचें ते अभि-धान असण्यांत व प्रत्यक्ष मावशी करता जिजी किंवा जिजमाय ही स्वतंत्र संज्ञा असण्यांत स्वारस्य काय? जी आईची बहीण सावत्र आई नसेल तिला मावशीमाय म्हणण्यांत तिचा अपमान होतो. म्हणजे एके काळीं सपत्नित्व हे भगिनी पुरतेंच मर्यादित होते. भगिनीच सपत्नि असण्याचा प्रकार सांघिक विवाहकालींच असणें शक्य आहे.

१७ विवाह संस्थेवर शिव्यांचा प्रकाशः—

मात्रागमी ही एक शिवी खरी परंतु ती कल्पनेनें निर्माण झाली नाहीं. तर समाजाच्या उत्क्रांती ती द्योतक आहे. व्यवहार, धर्मशास्त्र व कायद्यांत जे निषेध असतात ते कल्पनेवर उभारलेले नसतात. समाजाच्या बदलत्या परिस्थितींत ते कधीं कधीं काल्पनिक वाटतात परंतु एकेकाळीं त्याचें मूळ हें सत्य परिस्थितींतूनच वर आलेलें असतें. हेमाद्रीच्या नांवावर मोडणारा श्रावणी सारख्या प्रसंगीं म्हणावयाचा प्रायश्चित्ताचा एक लांबच–लांब प्रयोग आहे. त्यांत उष्ट्रविक्रय वगैरे सारख्या अशा पुष्कळ गोष्टींचा उल्लेख आहे कीं जी तथाकथित पापें करणें तर दूरच पण नावानें सुद्धां तत्पूर्वी माहीत नसतात. तसेंच उपरोक्त मात्रागमी शब्दाचें असले पाहिजे. त्याचप्राच सारले शब्द कुटुंब, बहान (बहिण) बेटी आणि गोत या शब्दावरून बनवलेले भाषेंत रुढ आहेत.

गोत्रमूलक शब्दप्रयोग गोत्र संस्थेची निर्मिती आणि जोपासना दाखवितो. मुसलमानांत ही शिवी असणेंच शक्य नाहीं. कारण त्यांच्या विवाह संस्थेंत गोत्र ही मर्यादा नाहीं.

१८ व्युत्पत्तिशास्त्रांत अहिराणीचें स्थानः —

भिन्न भिन्न भाषांचा तौलनिक अभ्यास करणारांस

अहिराणींत चांगलीच सामुग्री मिळण्याचा संभव आहे. तौलनिक व्याकरणाच्या दृष्टीनेंहि अहिराणीचा चांगलाच उपयोग होण्यासारखा आहे. भारतीय आणि भारतीयेतर आर्यवर्गीय भाषांशीं अहिराणीचें विलक्षण साम्य व्याकरणांत व वर्णप्रक्रियेंत आढळण्या सारखें आहे आणि अतांपर्यंत प्रख्यात झालेल्या अनेक सर्व सामान्यसिद्धांतांना पुष्टी देणारा अधीक पुरावा या भाषेंत मिळण्यासारखा आहे.

वैदिक वाङ्मयांत व त्यानंतरच्या संस्कृत वायङ्मांत न आलेले परंतु पूर्व वैदिक भाषांत असणारे असे कित्येक शब्द अलिकडे संशोधकांनीं हुडकण्याचा प्रयत्न केलेला आहे. अहिराणींत अशा प्रकारचे शब्द सापडणें पुष्कळ संभवनीय आहे. उदाहरणा दाखल हाब्या व चिडो हे दोन शब्द घेऊं.

१९ हाब्याचिड्यांचें पूर्व वैदिकत्वः —

हाब्या हा शब्द खानदेशांत आणि वऱ्हाडांत वापरतात. हाब्या म्हणजे कावळा आणि चिडो म्हणजे चिमणी हे दोन्हीं शब्द अहिराणींत सर्वमान्य आणि सोळा आणे रुढ आहेत. हाब्या हा वऱ्हाडांत असला तरी मराठीच्या कोशांत अद्याप समाविष्ट झाला नाहीं. आणि झाला तरी तो कानव्याच्या खाली बसेल.

अहिराणींत कावळ्याला हाड्या शिवाय शब्दच नाहीं; चिडी ही हिंदींत चिडिया अशा रुपांत आहे.

हाड्या या शब्दाची दोन छकलें केली तर तीं हा+डया अशी होतात. आणि चिडीची ची+डी अशी होतात. दोन्ही शब्द संस्कृत आणि वैदिक भाषेंत नाहींत परंतु हाड्याशी साम्य दाखविणारा हाडुक्य असा एक संस्कृत शब्द सापडतो. या दोन छकलांपैकीं शेवटचे जे, ड्या, डी तें संस्कृतांत धातूच्या रुपानें सापडते. डी डय् उडणें. आणि पहिले ह हें विह यांत आढळतें. विह हा शब्द सुद्धां पुन्हा फोडून वि+ह असा मोकळा करता येतो आणि वि म्हणजे विशेष व ह म्हणजे उंच आणि त्यावरून लक्षणेनें आकश असा होऊ शकला असें म्हणता येतें. तेव्हां या हला डी जोडून म्हणजे उंच उडणारा अशा अर्थी कावळा शब्द बनला असें म्हणता येतें. चिडीतील पहिली चि अल्पत्व दाखविणारी व डी उडणारी म्हणजे अल्प उडणारी ती चिडी म्हणजे चिमणी. व्युत्पत्ति अगदीं यथार्थ जमते आतां हे शब्द संस्कृत वाङ्मयांत नाहींत. कोशांत तर नाहीतच नाहींत. परंतु अगदीं सोळा आणे संस्कृत शब्द बीजांपासून बनले आहेत असें दिसून येईल.

२० भाषा भगिनींशी थोडी तुलनाः—

मराठी आणि अहिराणी या दोनच भाषा घेतल्या

तर त्यांत अनेक शब्दात मोठे भिन्न नियम आढळून येतात. कांहीं मराठींतील शब्दांतील अनुस्वार अहिराणींत नष्ट झालेले दिसतात. जसें जंत व खंत अहिराणींत जत व खत होतात. तर उलट मराठींत अनुस्वारावाचून येणारे शब्दांत अहिराणींत अनुस्वार येतो. जसें मराठी मग अहिराणी मंग.

मराठी ठिणगी अहिराणींत चिनगी होतें.

मराठी सरकणें अहिराणींत खरकणें होतें.

नबेदा म्हणजे अदृष्य होणें. हा शब्द संस्कृत वरून व्युत्पादावयाचा कीं पर्शीयन वरून हा प्रश्न पडतो. संस्कृत पर्शियनांचें मूळ जरी एक असले तरी अहिराणींत हा शब्द पर्शीयनवरून आला कीं संस्कृतावरून आला या गोष्टीला कांहीं तरी महत्व आहेच. संस्कृत पद्धतीनें नभूत = नबूद = नबेदा व पर्शीयन प्रमाणें नबूद = नबेदा असें होते.

२१ दीर्घ अचें अस्तित्व:—

अहिराणीचा आखरी एक विशेष म्हणजे तिच्यांत दीर्घ अ हा स्वर आहे. देवनागरी किंवा तत्सदृश दुसऱ्या कोणत्याही लिपींत हा स्वर स्वतंत्रपणें दाखविण्याची सोय नाहीं. अहिराणी एकदा लेखन प्रविष्ट करावयाची म्हणजे तिच्यांत हा दीर्घ अ सतत येणार.

मराठी बोलभाषेंत शेवटचा एकार अकारांत बोलतांना तो अ एचा प्रतिनिधी म्हणून दीर्घ उच्चारला जातो जसें ‘ घरें दारें करणें चांगलें ’ हें बोलतांना ‘ घरं दारं करणं चांगलं. अगदीं हेंच वाक्य अहिराणी होऊं शकतें. पण त्यांत अर्थ फक्त एक वचनाचा निघतो. जसें ‘ घर दार करन चांगल ’ अनेक वचनीं ‘ घरे दारे करन चांगल ’ असें होईल. पण अहिराणींत कित्येकवेळीं क्रियापदाच्या स्वरुपांत केवळ उच्चारानें बदल दाखविला जातो जसें आज्ञार्थ :– तू काम कर. आणि प्रश्नार्थकः– तू काम करऽ? किंवा भूतकाळः– तू काम करऽ. कांहीं अहिराणीचे उच्चार व तिचीं वैशिष्ट्यें हीं इतर विद्यमान भाषांत न सांपडणारीं अशीं आहेत.

२.२ मराठी व अहिराणीच्या साहचर्याचा परिणामः-

खानदेश अभीरदेश म्हणून गेल्या दोन हजार वर्षांपासून प्रसिद्ध आहे. परंतु या प्रदेशावर राजकीय बाबतींत महाराष्ट्राचेंच वर्चस्वाचा परिणाम म्हणचे दरबारांत, कागदपत्रांत वगैरे मराठीचा उपयोग व प्रवेश झालेला दिसतो. यामुळें मराठीपेक्षां निर्भेळ निराळा अहिराणी शब्द समुच्चय हुडकून काढतांना फार थोडी शब्द संपत्ति हाताशी येणार आहे. तथापि जी कांहीं थोडी सामुग्री हाती लागेल तिच्यांत तिच्या स्वत्वाचें न

मूलतः मराठीपेक्षां निराळेपणा असल्याच स्पष्ट पुरावे हाती लागतात. खानेदशांत मराठीचा इतका सर्वदूर प्रसार झालेला आहे आणि अहिराणी भाषेंत मराठीच्या लकबा, वाक्प्रचार आणि शब्द प्रयोगाचा इतका सुळसुळाट झाला आहे कीं वर वर पाहून अहिराणी ही वऱ्हाडांतील किंवा नगराकडील खेडवळांच्या भाषेप्रमाणें मराठीचें एक प्रादेशिक अशिष्ट रूप (Slang) असावें असाच बहुजन समाजाचा समज झालेला आहे. परंतु तो वर वर दिसणाऱ्या सादृश्यावर आणि खानदेशी लोकांच्या बनलेल्या दुभाषी व्यवहारावर आधारलेला आहे हें विसरून चालणार नाहीं. अहिराणी भाषे प्रमाणेंच खानदेशांतील समाजाचें कांहीं सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. हें वैशिष्ट्यहि असेंच प्राचीन परंपरागत आणि स्वतंत्र आहे असे आढळून आल्यावर तर या दोन भाषा आणि हे दोन समाज या आर्यांच्या स्वतंत्र दोन शाखा असल्याचें पटूं लागतें. नमुन्यादाखल येथें अहिराणींतील एक दोन गाणीं देऊन हा पूर्वार्ध आटोपतो.

आर्या (गवळिणीचे उद्गार)

नांद तुन्ही मुरलीना ऐकिसनी मी तशीज घाबरनु ॥
धावत पळत ऊनु नेसत लुगड तशीज पंघरनु ॥१॥

मराठी रुपांतर

नाद तुझ्या मुरलीचा ऐकुनिया मी तसींच घाबरलें ॥
धावत पळत आले नेसत लुगडें तसेंच पांघरलें ॥१॥

मुलांचें खेळांतील गाणें.

गडे व गडे, तुले धरु कडे, कडे कसाले?
दगडे येचाले. दगड कसाले? ढेर भांदाले.
ढेर कसाले? मळा कराले. मळा कसाले? गहू पहिराले.
गहू कसाले? पैसा कराले. पैसा कसाले? बायको कराले.
बायको कसाले? पोरे व्हवाले. पोरे कसाले? बाबा म्हनाले.
आन् बाबा कसाले? चाव्हडीवर बठाले! ॥ १ ॥

अर्थ (मराठी रुपांतर)

गडे तुला कडेवर घरु. कडेवर कशाला? दगड वेचायला. दगड कशाला? विहीर बांधायला. विहीर कशाला? मळा करायला. मळा कशाला? गहू पेरायला. गहू कशाला? पैसा करायला. पैसा कशाला? बायको करायला. बायको कशाला? पोरें होण्याला. पोरें कशाला? बाबा म्हणायला. आणि बाबा कशाला? चाव्हडीवर बसायला!

—x—

अहिराणी भाषा व संस्कृति
(उत्तरार्ध)

१ **संस्कृति म्हणजे कायः—** संस्कृति शब्द अत्यंत व्यापक आणि लवचीक आहे. कुठल्याही एका मानव-जातीच्या जीवनाच्या सर्व अंगोपांगांचा व त्या अंगोपां-गांवर प्रकाश पाडणाऱ्या सर्व मूर्त आणि अमूर्त साधन वैशिष्ट्यांचा संस्कृतींत समावेश होतो. सांस्कृतिक दृष्टया तुलना करावयासाठीं घ्यावयाच्या मानवसंघाचे परिणाम अथवा लहानमोठेपण हें प्रयोजनाच्या स्वरुपावर अवलं-बून आणि सापेक्ष असते. भारतीय आणि भारतीयेतर या भूमिकेवरून भारतीयांची एक संस्कृति धरता येते तर प्रत्यक्ष भारतांतच हिंदू, मुसलमान, जैन, बौद्ध, ख्रिश्चन अशा भिन्न भिन्न संस्कृति धार्मीक अधिष्ठानावरून दिसूं लागतात. एकट्या हिंदूचाच विचार करतांना त्यांत पुन्हा पोटभेद म्हणून आर्य, द्रविड, नाग, आभीर इत्यादि भाग पाडता येतात आणि त्यांतही व्यवहारांत धंदे, जाती व धर्मपंथाच्या दृष्टीनें पुन्हां बारीक भेद निर्माण करता येतात. एकटे अहीरच घेतले तर त्यांत अहिर उपपद धारी ज्या जाती आहेत त्या प्रत्येकींत कांहीं तरी वैशिष्ट्य असते आणि अशा दृष्टीनें त्यांच्या संस्कृतींत अगदीं संकुचित अर्थानें फरक आढळू शकतो. म्हणजे अहीर सोनार व अहीर सुतार व अहीर शिपी हे अहीर

संस्कृतीचे घटक म्हणून एका वर्गांत आले तरी प्रत्यक्ष सोनार, सुतार, शिपी अशा भिन्न भिन्न पेशामुळें पुन्हा एका विशिष्ट पोट संस्कृतीचे धनी झालेले असतात.

२ संस्कृतीवर प्रकाश पाडणाऱ्या साधनांचे वैपुल्य आणि वैचित्र्यः—

संस्कृतीवर प्रकाश पाडणारीं साधनें अनेक प्रकारची आणि त्या त्या संस्कृतीच्या जिवंत पणाच्या मानानें कमी अधिक प्रमाणांत उपलब्ध होतात. मोहनजो दारो येथील संस्कृतीवर तेथील उत्खननांत सापडणाऱ्या मडकीं, गाडगीं, विटा, घरांचे अवशेष, मुद्रा, चित्रें इत्यादि साधनांच्या साहाय्यानें पडेल तेवढाच प्रकाश पाडता येतो. तर एकेकाळच्या वैदिक संस्कृतीवर विद्यमान आणि उपलब्ध वैदिक वाङ्मयाच्या सहाय्यानें प्रकाश पाडता येतो. कारण दोन्ही संस्कृतीपैकीं पहिली तर नामशेषच आहे. आणि दुसरी म्हणजे वैदिक ही संस्कृति आज अनेक शतकांच्या व सहस्रकांच्या ओघांतून गळती आणि भरती अशा दोन्ही क्रियांच्या सपाट्यांत सापडून एका अगदीं नव्या स्वरूपांत भारतांत विद्यमान आहे. अहीर उर्फ आभीर संस्कृति ही सुद्धां अशीच आज हजारों वर्षे स्थळ काळाच्या कचाट्यांत सापडून आच तागायत टिकाव धरून आहे. आणि तिची आपणांस कांहींशी कल्पना येण्यासाठीं आजच्या खानदेशांत आभीर या

नांवानें ओळखल्या जाणाऱ्या समाजाची भाषा, रिति-रिवाज, देवकल्पना, वस्त्रे प्रावर्णे वाहनादि गोष्टींचा वैशिष्ट्याच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. त्यापैकीं भाषेच्या दृष्टीनें थोडासा विचार पूर्वार्धांत झालेलाच आहे. आतां भाषेच्या व्यतिरिक्त इतर साहित्याचा परामर्श घ्यावयाचा आहे.

३ काळाच्या ओघांत सांस्कृतिक देवाण घेवाणः—

धर्म व देव कल्पना या सारख्या गोष्टी फार झपाट्यानें प्रसार पावून एका संस्कृतींतून दुसऱ्या संस्कृतींत फार जलद फैलावतात असें म्हणतात. त्या प्रमाणें आज खानदेशांत अहीर समाजांत आढळणारे किती आचार आणि विचार हे त्यांचें मूळचे आहेत. आणि त्यापैकीं किती त्यांनीं उसनवारी करून आणले व कुठून आणले हें पहाणें फारच मनोरंजक आणि बोधक होईल.

४ खानदेशांत आभीरांचा विकासः—

खानदेश हा देश म्हणण्याला पात्र असा एक नैसर्गिक मर्यादींनीं वेढलेला स्वतंत्र भूभाग आहे. उत्तरेस सातपुडा. दक्षिणेस सह्याद्रीचे फाटे. पूर्वेस अजंठा पहाड आणि पश्चिमेस पुन्हा सह्याद्री व सातपुडा यांचा संगम असा चहुबाजूनीं पर्वतांनीं वेष्टित परंतु मधें तापी, पांझरा,

गिरणा व पूर्णा या नद्यांच्या सुपीक खोऱ्यांनी युक्त असा एक स्वयंपूर्ण व संपन्न प्रदेश आहे. दोन अडीच हजार वर्षांपूर्वी या वैशिष्ट्यावर लुब्ध होऊन अजिंठ्याच्या पाहाडांत बौद्ध भिक्षूंचे विहार निर्माण होण्यास सुरवात झाली ती एक हजार वर्षे पर्यंत चालू राहिली. या वैशिष्ट्यांनीच दक्षिणेंतील दुसऱ्या मुसलमानी सुलतानतीला म्हणजे फरुकी घराण्याच्या सत्तेला जन्म दिला. अव्वल इंग्रजींत नीळीसाठीं व सांप्रत कपाशीसाठीं हा प्रदेश व्यापाराला अत्यंत अनुकूल असा गणला जातो. येथल्या जमीनीचा सुपीकपणा व तन्मूलक ऐतद्दीयांचा आळशी-पणा आणि लढाऊ वृत्तीचा आभाव या गोष्टी सर्व प्रसिद्ध आहेत. तेव्हां सर्व हिंदुस्थानभर कमी अधिक संख्येत असणारी आभीर ही जात खानदेशांत अधिक सुखांत राहिली असल्यास नवल नाहीं. आणि या सुखसमृद्धी-तच या आभीर जातीचा विकास झालेला खानदेशांत दिसतो. गुजराथ, नेमाड, संयुक्त प्रांत, बुंदेलखंड वगैरे प्रदेशांत अहीर आहेत. पण ते फक्त गवळी व मेंढपाळ या दोन जातींचेच आहेत. खानदेशांत अहीर उपपद धारण करणाऱ्या अनेक जाती आहेत. जसें अहीर सोनार, शिंपी, सुतार, न्हावी, कुंभार, धनगर, गवळी वगैरे. याचा अर्थ असा कीं खानदेशांत वसाहत केल्या नंतर या एकेकाळीं कृषी आणि गोरक्षण करणाऱ्या

जातींत अनेक कलांचा व धंद्यांचा चांगला विकास झाला आणि त्या विकासाला खानदेशांत खूप वाव मिळाला. खानदेश नैसर्गिक मर्यादामुळें एकाद्या नैसर्गीक बंदरा-सारखा असल्यानें बाह्य जगांतील हालचालीचा त्यावर फारच थोडा प्रतिध्वनि उमटला.

५ खानदेशांतील जातीचे ठळक थरः—

अगदीं वन्य जाती घेतल्या तर भील, पावरे, मावची यांचा एक थर त्यावर, कोळी व भोई याचा दुसरा थर, तिसरा अहीर उपपद धारण करणाऱ्या कारागीर व धंदे-वाईक लोकाचा थर आणि चौथा अथवा वरचा म्हणजे क्षात्र वृत्तीच्या मराठे व रजपूतांचा होय. या पैकीं मराठा व रजपूत आज गांवोगांवचे पाटील देशमुख असले आणि जरी राजकीय आणि सामाजिक बाबतींत ते पुढारी ठरत असले तरी खानदेशांतील अहीर भाषा व संस्कृतींनीं त्यांना आत्मसात करून घेतले आहे. खानदेशांतील रजपूत आजहि नेमाड व गुजराथेंतील रजपूतांचे सोयरें आहेत आणि होतात. तसेंच खानदेशांतील मराठा समा-जाचा महाराष्ट्रांतील समाजाशी शरीर संबंध पूर्वींपासून चालू होता व पुढें राहील. परंतु या दोन्ही समाजांच्या चुली जवळ, देवघरांत आणि पाळण्यांत अहिराणी भाषा, रितिरिवाज आणि कुळधर्म, कुळाचार जाऊन पोहचले आहे हे जगजाहीर आहे. आणि भाषा सोडली तर

कानबाई सारखे कुळाचार अगदीं स्पष्टपणें ज्यांचें मूळ खानदेशाबाहेर आहे अशा ब्राह्मणांत सुद्धां शिरले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हा अहिरांचा सांस्कृतिक विजय होय.

६ अहीरांत ब्राह्मण जात निर्माण झाली काय?

कागदों पत्रीं स्वतःला आभीर म्हणवणारे ब्राह्मण खानदेशांत नाहींत. अर्थात खानदेशा बाहेर नाहींतच. परंतु एकेकाळीं आभीर या नांवानें ओळखली जाणारी ब्राह्मण जात असावी असें आभीर ब्राह्मणाबद्दलचे उल्लेख येतात त्यावरून दिसतें. अहिरसुतार, अहिरसोनार, अहिर म्हणजे आभीर ब्राह्मण या शब्दाचे दोन अर्थ होतात. एक अहिर देशांत राहणारा सुतार, सोनार, अथवा ब्राह्मण किंवा मूळचा अहिर जातीचा असून पुढें धंद्यानें झालेला सुतार, सोनार आणि ब्राह्मण. यापैकीं पहिल्या अर्थानें अभीर किंवा आहीर म्हणवण्याला सर्व लोक तयार असणार. दुसऱ्या अर्थी अहीर उपपद लावूं देण्याला कोणीच राजी होणार नाहीं. आणि या दृष्टी–नेंच खानदेशांत विद्यमान असणाऱ्या ब्राह्मण जाती पैकीं कोणीच स्वतःला आभीर म्हणू देत नाहींत. परंतु हिंदू–स्थानांतील जातींचा व विशेषतः ब्राह्मणांच्या जातींचा इतिहास पाहिला तर आभीर ब्राह्मण ही एक प्रादे–शीक म्हणा, वांशिक म्हणा, जात खानदेशांत असावी.

परंतु सामाजिक उच्चनीचत्वांच्या कल्पनांच्या आहारी जाऊन ती आजच्या खानदेशांतील ब्राह्मणांच्या एक किंवा अनेक जातींत संधी सापडेल तशी गडप होऊन गेली असावी असा प्रस्तुत लेखकाचा कयास आहे. याचें एक ढोबळ कारण असें कीं येवढा मोठा समृद्ध आणि विस्तीर्ण प्रदेश ब्राह्मणांत वैशिष्ट्य निर्माण करण्यास अगदीं पुरेसा आहे. जेथें कनोजे, शरयूपारी, कऱ्हाडे, नारमदेव वगैरे नद्या व शहरांवर स्वतंत्र जाती बनू शकतात तेथें हजार दोन हजार वर्षें आभीर म्हणून गाजणारा देश ब्राह्मणांचें स्वतंत्र वर्गीकरण करूं शकला नाहीं हें म्हणणें पटत नाहीं. उलट आभीर ब्राह्मण या नांवाचे दोन चारशे वर्षांपूर्वींच्या ग्रंथांत उल्लेख आहतच.

७ गणराज्याचे अवशेषः— खानदेशांत गणराज्याची पद्धति एके काळीं चालू असल्याचा एक ठळक पुरावा एका म्हणींत आहे. 'तू सवासीन मी गन नको करूं लोकम धन' ही म्हण सर्वत्र प्रचलित आहे. हिचा संदर्भपूर्वक अर्थ असाः-- जेव्हां एकाद्या हव्यकव्याच्या वेळीं दुसऱ्या कोणास जेवणाचे आमंत्रण देण्याची पाळी येते तेव्हां पुरुष आपल्या स्त्रीला म्हणतो कीं कशाला बाहेरची सवाष्ण सांगतेस? तू स्वतः सवाष्ण आहेसच आणि मी गण आहेच उगीच आपलें अन्न लोकाचं धन कां करतेस म्हणजे लोकांसाठीं कां खर्चीं घालतेस. यांत

स्वतां पुरुष गण म्हणवतो. म्हणजे एकेकाळीं गणाला किंवा संघाच्या प्रमुखाला हव्यकव्याच्या वेळीं खाद्य-पेयांनीं भोजनांनीं संतुष्ट करण्याची चाल या लोकांत असावी. त्याचाच अवशेष हा गणमूलक वाक्प्रचार होय.

तमाशा म्हणून एक ग्रामीण करमणुकीचा प्रकार आहे. त्यांत आरंभीं नमन म्हणजे परमेश्वराचे आणि त्यानंतर गण म्हणावयाचा असतो. नमन आणि गण या दोन भिन्न संज्ञा वस्तुतः नमनावाच्याच द्योतक आहेत. पण नमन हें देवाला उद्देशून आणि गण हे गणाला म्हणजे संघनायकाला उद्देशून म्हणावयाचे नमनच आहे. तमाशा म्हणजे नाटक हा यावनी शब्द आहे परंतु या शब्दानें ध्वनित होणारा करमणुकीचा प्रकार हा प्राचीनतम आहे. याचें कारण तमाशाच्या परंपरांगत रूढी प्रमाणें नमन व गण म्हणून झाल्यावर नंतर गौळणी म्हणायच्या असतात. या गवळणी म्हणजे कृष्णलीलाच होय. त्यांत यथावकाश कमी अधीक वेळ घालवून मग पुढें एकादी लावणी किंवा झगडा म्हणजे संवाद वगैरे लावतात. परंतु परंपरेचे तमासगीर हे नमन, गण व गवळणीचा सांप्रदायिक पाठ म्हटल्या खेरीज खऱ्या तमाशास सुरवातच करीत नाहींत. याचा पुन्हा दुसरा असा निष्कर्ष निघतो कीं या तमाशांत गणराज्यांचें जसें अवशेष आहेत तसेंच कृष्णलीलेचें मूळचें तें नाटक असून आतां त्यावर इतर वाढ होऊन तें तमाशाच्या नांवानें मुसलमानी अमदानींत लोकप्रिय झाले.

अगदीं ऐतखाऊ मनुष्य असला, कधीं काम धामाला लक्ष न देतां, आणि फक्त बसून खाऊ लागला तर त्याला 'खात्या गन' असें म्हणतात. याचा अर्थ निव्वळ खाणारा गण. गणराज्यांतील गण हे अर्थातच गांवांतील व समाजांतील इतरांच्या श्रमावरच जगणार. उदरनिर्वाहासाठीं त्यांना प्रत्यक्ष शेती, गोरक्ष किंवा वाणिज्य करण्याची प्रारंभीं तरी गरज नसावी. पुढें पुढें गणांचा वंश विस्तार वाढल्यामुळें त्यांनाहीं स्वतः शेतीभातो करण्याची पाळी आली.

राजाला देण्याची खंडणी आणि शेताच्या मालकाला जमीनीबद्दल द्यावयाचा खंड यांत मूलतः फरक नाहीं. जमीन कसणारा आणि त्याच गांवांत राहणारा क्षत्रिय यांचा संबंध प्रारंभीं तरी असाच असला पाहिजे. जमिनीचे आर्थिक महत्व हें आज वाढलें. वाढत्या लोक संख्येमुळें आतां शेत जमिनीची टंचाई भासू लागली. प्राचीन काळीं शेतकरी शेताबद्दल जो खंड देई तो त्या शेताच्या किंमती वरील व्याजाच्या स्वरुपाचा नसून आजच्या जमीन महसूलाच्या म्हणजे सरकारी कराच्या स्वरुपाचा होता.

८ खानदेशी सटी आणि इजिप्तची शेशेट् :—

जन्मलेल्या बालकाच्या पांचव्या किंवा सहाव्या

दिवशीं सटीची पूजा करण्याची एक खानदेशांत चाल आहे. त्या दिवशीं रात्रीं एका पाटावर हळकुंड, वेखंड, बोराची काडी आणि आरकाटी नांवाचा शमीचा एक प्रकार आहे त्याचीं फाटकें आणून मांडून ठेवतात. तेथेंच चवलीच्या आकाराची तांबें, चांदी, किंवा सोन्याची सटी नांवाची देवी सोनाराकडून बनवून आणलेली ठेवतात. त्या सटीच्या टाकांत एक स्त्री काढलेली असून तिच्या हातांत एका माणसाचें मस्तक काढलेलें असतें. त्या पाटावर एक कोरा कागद व दऊत आणि लेखणी ठेवतात. पुढें एक लहानशी पणती लावून सुईण निघून जाते आणि त्या पणतीचा प्रकाश कोणी पहायचा नसतो. त्या रात्रीं सटी ही त्या नूतन बालकाचें भविष्य सांगते आणि त्या बरहुकूम ब्रह्मदेव तें त्या बालकाच्या कपाळावर लिहितो असा समज प्रचलित आहे.

दुसऱ्या दिवशीं ती सटी त्या बालकाच्या गळ्यांत किंवा मनगटांत बांधतात. आणि त्याचें जावळ उतरेपर्यंत म्हणजे सुमारें वर्ष दोन वर्षें ती त्याच्या गळ्यांत बांधलेली असते. इजिप्तच्या प्राचीन देवतांत शेशेट् नांवाची एक देवता असून तिच्या जवळ तिचा एक लेखकही दाखवलेला असतो. या शेशेटचें आणि अहिराणी सटीचें विलक्षण साम्य आहे. सटीचींच सटवी, खटी आणि हिंदी छट्टी ही रूपें होत

९ बालाजी आणि असीरियन बाल्ल :—

प्राचीन असिरियन व बाबिलोनियन लोकांत बाल्ल या नांवाची धनधान्याची समृद्धी करणारी एक देवता होती. खानदेशांत खळ्यांत धान्याची रास पडली म्हणजे प्रथम त्यांतून शेर दोनशेर धान्य काढून त्याची कांहा गूळ साखरे सारखी वस्तु आणून वाटतात त्याला बालाजी करणें म्हणतात. तसेंच म्हैस व्याली म्हणजे तिच्या दुभत्यातून एके दिवशीं बालाजीच्या नांवानें शिरा करून खातात. त्याला बालाजीची कढाई केली म्हणतात. शिऱ्याच्या प्रसादाला 'कटाह प्रसाद' म्हणण्याची पंजाबांत चाल आहे. कारण तो कढईत होतो. या दोन बालाजीच्या प्रसादाच्या प्रसंगांचा धनधान्याच्या समृद्धीशीच संबंध आहे हें दिसून येईल. आणि बालाजी शब्द मूळ बाल किंवा बाला असाच असून जी हें सन्मानार्थक आहे हें सांगावयास नको.

खानदेशांत बालाजीचीं मंदिरें ठिक ठिकाणीं असून त्याची आश्विन शुद्ध ११ ला रथातून मिरवणूक काढण्याचा बहुतेक शहरांतून प्रघात आहे. मंदीरांत बालाजी हा एकटाच असतो. त्याच्या जवळ स्त्री देवता नसते. आश्विन शुद्ध १ पासून दहा दिवस पर्यंत दररोज रात्रीं त्याची नाग, हरण, हत्ती, वाघ, सिंह, सूर्य, चंद्र, गरुड, मारुती, विमान वगैरेंवर बसवून मिरवणूक

काढतात. त्यास वहन असें म्हणतात. दसऱ्याच्या दिवशीं घोड्यावर बसून बालाजी शिलंगणाला जातो आणि एकादशीला रथांतून मिरवतो.

बालाजीचा रथ जरी लोक ओढतात तरी त्याचा देखावा मोठे लाकडी घोडे ठेऊन दांडे, जूं वगैरे अगदीं यथातथ्य ठेऊन खरोखरच्या रथा सारखाच केलेला असतो. बालाजीच्या रथावर एक सुंदर लाकडी पुतळा त्या घोड्याचे लगाम व हातात चाबूक घेऊन रथ हाकणाऱ्याच्या थाटांत बसविलेला असतो. या पुतळ्याला अर्जून म्हणतात. म्हणजे बालाजीचा रथ अर्जून हाकतो. हा बालाजी देव मारवाडांतील व्यापाऱ्यांतही फार लोकप्रिय असा आहे.

बालाजी ही वैदिक देवता नाहीं पुराणांतही तिचा मागमूस नाहीं. आणि समृद्धीशी तिचा संबंध पाहिल्यावर जगाच्या पोषण करणाऱ्या वैदिक विष्णू प्रमाणेंच ही सूर्यमूलक देवता असावी असें दिसतें. आणि असा धन--धान्यांची रेलचल करणारा म्हणजे शेतांतून धान्य, जंगलांत गवत विपूल करून त्यामुळें दूध दुभत्याची लयलूट करणारा हा सूर्य आपल्या रथांतून येत असतां त्याच्या सारथ्यासाठीं पुढें होणारा अर्जून हा महाभारतांतला धनुर्धारी म्हणून गाजलेला अर्जून नसून तें अर्जुनी नक्षत्र असावें आणि आपल्या उदयानें समृद्धिकर अशा

वसंत किंवा वर्षर्तूला प्रारंभ करणाऱ्या सूर्याच्या आगम-नाची सूचना देत असावें अशी संगती या चालू रूढीची लागू शकते.

१० गहू पेरणीची सीतापूजनाची वैदिक परंपराः—

खानदेशांत गहू पेरण्याला जातांना पांभरीची पूजा करतात. शेतांत गेल्यावर शेताच्या एका कोपऱ्यांत ढेकळें रचून त्यांत रुईची (सं. अर्क) फाटके रोऊन दहीभात किंवा गोडगोड पदार्थाचा नैवेद्य दाखवून पूजा करतात. या पूजेला सीतापूजन म्हणतात. सीता ही क्षेत्ररक्षक देवता म्हणून वैदिक वाङ्मयांत आलेली आहे. नांगरानें जी शेतांत रेघ पडते तिलाही सीताच म्हणतात. अशा या नांगराच्या भेगेंतूनच रामाच्या सीतेचा जन्म झालेला रामायणांत आहे आणि म्हणूनच तिचें नांव सीता आहे. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सीतेचा जन्महि फाल्गुनी म्हणजे अर्जुनी नक्षत्रावर झालेला आहे.

लाक्षणिक अर्थानें सीतेचें चरित्र घेतलें तर त्यांतील या नक्षत्राचा, तसाच बालाजीच्या रथाचा सारथी अर्जुन यांची एका बाबतींत विलक्षण एकवाक्यता झालेली दिसते. ती म्हणजे फाल्गुनी नक्षत्राचा उदय हा एके काळीं धान्याच्या व शेतीच्या हंगामाचा द्योतक होता.

या गोष्टींतून कालनिर्णय करता येण्यासारखा असून त्याच्या जोडीला आपल्याकडे फाल्गुनी पौर्णिमेला येणारा शिमग्याचा सण व त्याची चिकित्सा मदत करूं शकेल. परंतु कालनिर्णयाचा प्रश्न प्रस्तुत छोट्याशा पुस्तकाच्या मर्यादेनें नाइलाजानें दूर ठेवणें भाग पडत आहे. तथापि येवढें मात्र येथें नमूद करावेसें वाटतें कीं वेदकालाची आणि भारतीयांच्या संस्कृतीची प्राचीनता ठरविण्याच्या विषयाला अनेक नव्या पुराव्यांची व नव्या दृष्टीची जोड मिळणें शक्यच नव्हे तर सुलभ आहे.

११ आगारी व यज्ञ संस्थेची बाल्यावस्था :—

अहिराणी समाजांतील कांहीं आचार फार चमत्कृतिजनक आहेत. आणि त्यांचा तपशील पाहतांना आभीर समाजाचें वैदिक परंपरा आणि संस्कृतीशीं कसें ठळक साम्यच नव्हेतर ऐक्य आहे ही गोष्ट पटते.

श्राद्ध पक्षाच्या दिवशीं सैंपाक झाल्यावर त्या चुलींतील अग्नींतच अन्नाच्या आहुती देतात. याला आगारी म्हणतात. हा ब्राह्मणांतील वैश्वदेवाचा पर्याय. आपण वैश्वदेवाचा विचार केला तर त्यांत ‘ अन्नं अग्निसंस्कारं कृत्वा उत्तरे चरु पात्र स्थापनम्.’ असें वाक्य असून त्यावेळीं आयताच घरांतील चुलीवरून शिजवून आणलेल्या भाताचें पान वैश्वदेवाच्या स्थंडिलांतील विस्तवावर

धरून आपण ते उत्तरेस ठेवतों. म्हणजे खरोखर अग्नि-संस्कार झालेलें अन्न असूनही त्यावर पुन्हां अग्निसंस्कार करण्याचें नाटक करतो. नदी, तळें, वगैरे जलाशयावर न जातां श्रावणीच्या दिवशीं, एका मोठ्या प्रशस्त दिवाणखान्यांत कदपीतांबर नेसून, थाटामाटांत पाटावर बसून कुशाग्रानें अंगाला गोमय, मृत्तिका, भस्म लावून वर पळीभर पाणी शिंपडून जसें मृत्तिका स्नान, भस्म स्नान वगैरे अनेकविध स्नानांची झटपट नकली तालीम शहरांतून होते त्यांतलाच घरोघरीं होणारा हा प्रकार. या वैश्वदेवाच्या अग्नीवर भातशिजवण्याच्या नाटकांतून खरें सूत्र हें बाहेर पडतें कीं एकेकाळीं किंवा यज्ञसंस्थेच्या प्रारंभी ज्या अग्नीवर चरु शिजविला जाई त्यावरच हवन व्हावयाचें. जेथें परंपरा आहे तेथें वैश्वदवासाठीं घ्यावयाचा अग्नि हा सैंपाकाच्या चुलींतीलच चालतो. पाणी तापवण्याच्या चुलीतील किंवा बंबातील घेत नाहींत. म्हणजे खानदेशी अगारी हे यज्ञसंस्थेचे प्राथमिक स्वरुप आह. पारशी यज्ञशाळा किंवा अग्निमंदीराला अग्यारी म्हणतात आणि या प्रसंगोपात करावयाच्या बाल्यावस्थेंतील यज्ञाला आगारी म्हणतात. नांवाचें साम्य सुद्धां महत्वाचें असून दोघांत मूळ अग्नीच आहे.

१२. देवतऽ म्हणजे अग्निमूलक देवत्वः—

देव हा शब्द दिव् म्हणजे प्रकाशणें या धातू

पासून झाला आहे. म्हणजे देव प्रकाशत होते. याचा समर्थनीय अर्थ असा कीं देव प्रकाशांत रहात त्यांच्या वस्तींत घरांत प्रकाश करण्याची सोय होती. प्रकाश करण्याची युक्ति ते जाणत होते. रात्रीं कितीही अंधार पडला तरी त्यांतही ते आपल्या करामतीनें उजेड पाडीत. अदेवांत हें सामर्थ्य नव्हतें. ते अंधारांत रहात असूर्या नाम ते लोका अंधेन तमसावृता । याचा निष्कर्ष हाच. श्रद्धा, भावना, आणि आत्मगौरवाचा अतिरेक देव म्हणजे रेडियमच्या घड्याळाप्रमाणें ज्यांची अंगें अंधारांत चमकत असे अतिमानुष कोटीतले होते असें म्हणण्याला प्रवृत्ती देतो.

रामकृष्णांच्या चित्रांत किंवा मूर्तींजवळ तसेंच ख्रिस्ताच्याहि चित्रांत किंवा मूर्तींच्या मुखा भोवतीं एक तेजोवलय दाखविण्याची परंपरा आहे. देवळांत छोटी मोठी तबकें मूर्तींच्या डोक्यामागें ठेऊन हें काम भागवितात. याचें मूळ देवकल्पनांचा उगम सूर्य आणि तेज याच्यांतून आहे हें होय, असें संशोधकांचें मत आहे. आणि तेंच बुद्धिग्राह्य वाटतें.

देवाच्या दिव्यत्वाचें असें मूळ हुडकल्यावर त्यांच्या बद्दलच्या आणखी अनेक कल्पनांचा संगतवार उलगडा होतो. अग्नि हा हव्यवाहन आहे आणि देव हे अग्निमुख आहेत या दोन कल्पनाच घेऊया. हव्य म्हणजे

देवांचें अन्न तें अग्नि देवांना नेऊन पोंहोचवतो. म्हणजे देव आपलें अन्न अग्नीच्या डोक्यावर ठेऊनं मग स्वीकारतात. म्हणजे देव अन्न शिजवतात आणि मग खातात. तसेंच देव अग्निमुख आहेत म्हणजे ज्वालामुखी पर्वताप्रमाणें त्यांच्या तोंडांतून ज्वाला बाहेर पडतात असें म्हणण्यापेक्षा अग्निरुपी मुखांत शिजवून मग ते अन्न खातात.

जोंपर्यंत अग्नीचा शोध लावणारी जात स्वतःच्या सामर्थ्याची व शोधाची जाणीव ठेऊन होती तोंपर्यंत यज्ञांत अन्न शिजवून खाण्याचीच चाल असून पुढें कालांतरानें जेव्हां ही जाणीव नष्ट झाली आणि अग्नि हा अदेवांनाही साधला तेव्हां देव म्हणजे कोणीतरी अदृश्य आणि अतिमानुष कोटी आहे असा समज प्रसृत होऊन यज्ञांत अन्नाचा बराचसा भाग भस्म करण्यांत येऊं लागला असावा असें दिसतें.

आगपेटीच्या शोधापूर्वी, चकमकहि नव्हती तेव्हां, लाकडें एकमेकांवर घासून अग्नि निर्माण करीत. यज्ञांत अरणीमंथन करून अग्नि प्रज्वलित करतात. घासतांच जलद पेट घेणाऱ्या लाकडांत बोर व शमी ही दोन झाडें फार प्रसिद्ध आहेत. घरांतील दळण्याच्या जात्याला जर बोर व शमीचा खुंटा आणि माकडी बसवली तर दळतांनाच ते जळूं लागतात आणि म्हणून खेड्यापाड्यांतील

सुतार बोरीचीं व शमीचीं लाकडें या कामासाठीं उपयो-गांत आणीत नाहींत.

अहिराणी समाजांत व खानदेशांतील ब्राह्मणा खेरीज बहुतेक स्पृश्य जातींत लग्नाच्या आरंभीं देवतऽ आण-ण्याचा एक विधी असतो. महादेवाच्या किंवा मारुतीच्या देवळांत एका ताम्हनांत घरांतील देव शमी आणि बोरीचीं लहान फाटकें ठेऊन येतात. आणि घरून पूजेचें साहित्य घेऊन वाजत गाजत आणि मिरवीत जाऊन लग्न घराच्या एका दांपत्यानें ते देव व बोर शमीचे तुकडे पूजाकरून आणावयाचें असतात. या विधीला देवतऽ असें म्हणतात.

या विधींत देव असतात आणि देवच फक्त आणा-वयाचे असले, जसें एकादे कुटुंब विभागणीनें निराळे होते, तेव्हां घरांतील खंडोबा, गणपति, देवी, वगैरे कुलदेव वडील घराण्याकडे जातात व धाकट्या घराकडे लग्न निघाले म्हणजे मग सोनाराकडून ते नवे देव बनवून वाजत गाजत आणतात त्याला देव आणणेंच म्हणतात, देवतऽ म्हणत नाहींत. परंतु लग्नाच्या आरंभीं देवांना व शमी बोरीच्या तुकड्यांना आणणें म्हणजे देवतऽ असते. यांत देवतऽ हा शब्द देवत्व याचें रुप असून बोर आणि शमीच्या तुकड्यांतून असणारी अग्निनिर्माण करण्याची शक्ति आणणें म्हणजे देवत्व आणणें असा हेतू ध्वनित

होतो. देवत्व हें अग्नीवर अधिष्ठित होतें आणि तें अग्नीच्या रुपानेंच प्रकट करता येई याचें हें प्रत्यंतर होय. सटवीच्या पूजेतहीं याच बोर व शमीच्या काड्या लागतात आणि शमी हें झाड अग्निगर्भ असल्याचें संस्कृत वाङ्मयांत महशूर आहे

तसेंच महाराष्ट्रांत नवरदेव या शब्दापेक्षां नवरामुलगा हा शब्द जास्त रुढ आहे. गुजराथींत वराजो म्हणजे वरराज आणि उत्तरेकडे दूल्हा, बनाजी, वगैरे शब्द प्रचारांत आहेत. महाराष्ट्रांत, वयाच्या सत्तराव्या वर्षी सातवें लग्न करावयास निघालेला म्हाताराही लग्नापुरता तरी नवरामुलगाच म्हणवला जातो! परंतु खानदेशांत नवरदेवाला दुसरा पर्याय नाहीं. ज्याचे लग्न होते तो नवरदेव आणि लग्नाला आलेले वऱ्हाडी देव. देव हा शब्द नुसत्या लग्न होणाऱ्याच्यासाठींच असता तर त्याला फक्त देवच म्हटले असते. परंतु समाजांतील प्रत्येक व्यक्ति देव असल्यावर लग्न होऊं घातलेल्या देवाला नवरदेव म्हवणायाचे प्रयोजन ! याचा थोडक्यांत निष्कर्ष असा कीं एके काळच्या देव समाजाचें सांस्कृतिक लोण खानदेशांत चालत आलेलें आहे.

१३ जानव्याचें मूळरूप पोयतऽ :—

विवाहाच्या विधींत वधुवरांच्या गळ्यांत कच्च्या सुताच्या लडी पिवळ्या करून घालतात. आणि त्यांना

पोयतऽ असें म्हणतात. पोयतऽ हा शब्द संस्कृत उप-वीत शब्दापासून बनला आहे. उपवीत म्हणजे पट आणि त्याचीं सांगड यज्ञाशी घातली जाऊन पुढें ते यज्ञोपवीत बनले. डॉ. केतकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मांत्र संस्कृतीचे लोक आपल्या उपवीतांना यज्ञो-पवीत म्हणू लागले आणि इतरांनीं फक्त पोयतऽच घाल-ण्याचें चालू ठेवलें आणि तेंही लग्न प्रसंगींच.

खानदेशांत व महाराष्ट्रातील देशावरील जिल्ह्यांत स्त्रियांचे दशाफळाचें व्रत म्हणून एक श्रावणांत व्रत येतें त्या व्रतांत स्त्रिया कच्च्या सुताची हळदीनें रंगवलेली एक लडी भिक्षुकाकडून घेऊन पूजा नैवेद्य वगैरे करून आरती करून कांहीं ठरावीक गाठी १४ किंवा ९ मारून आपल्या किंवा मुलाच्या गळ्यांत कांहीं दिवस बांधतात व नंतर पुढें सोडून नदींत किंवा तळ्यांत, विहीरींत विसर्जन करतात. पुण्याकडे त्याला पोवतें म्हणतात. बायका पोवतें पूर्वींपासून घालत येत आहेत. तेव्हां या पोवत्याचें यज्ञोपवीत झाल्यावर बायकांना वगळलें असेल असें म्हणवत नाहीं. म्हणजे बायकांच्या उपनयानाची पूर्व तयारीच ही पोवत्यानें केली म्हणावयाची !

या पोयत्याचेंच यज्ञोपवीत आणि त्याचेंच पुढें जानवे होऊन आज दात, कानकोरण्या व किल्ल्या अडकवण्याला उपयोगी पडत आहे !

१४ अप्सरा आणि सूर्याचें परंपरागत अधिष्ठानः–

अहिराणी समाजांत अप्सरांचें पूजन अद्याप चालू आहे. प्रत्येक आड, विहीर, तळें, नदीचा घाट किंवा एकादा डोह किंवा ज्या ठिकाणीं पाणी असून तेथें माणसांची वर्दळ असते अशा ठिकाणीं एकाद्या सोइस्कर दगडाला शेंदराच्या आठ रेघा मारून तेथें आसरांची [अप्सरा] स्थापना केलेली असते. या आठ रेघांपैकीं सात आसरा असून आठवा म्हणजे नंतरचा म्हसोबा असतो. आसरा आणि म्हसोबा यांत बहीण भावंडांचें नातें असतें. या आप्सरांची प्रसंगोपात पूजा होते. त्यांना नवसही करतात. दही भाताच्या नैवेद्यावर या आसरा फार खूष असतात. आणि नैवेद्य दाखविण्याच्या रीतींत थोडा फरक असतो. सामान्यपणें देवतेच्या पुढें अन्न ठेऊन आपण नैवेद्य दाखवितो. परंतु आसरांना नैवेद्य दाखवावयाचा म्हणजे दहीभात त्यांच्या अंगावर शिंपडतात.

आसरांच्या या दहीभाताच्या नैवेद्याला बोहनऽ म्हणतात. कोकणांत बोडणाची रीत आहे. त्या बोडणांत व या बोहनांत बरेचसें साम्य दिसते. या आसरा पुष्कळ स्त्रियांना झपाटतात आणि कितीकांच्या अंगांत येतात. म्हसोबा हा सुद्धां पुरुषांच्या अंगांत येतो. अप्सरांना नवस करून बांगडी, टिकली, फुलांची फडकीं, हिरव्या–

बांगड्या व लाकडाचें लहान लहान पाळणे तसेंच कापडाचे घोडे चढवतात.

या अप्सरांचाच एक पर्याय मावल्या म्हणून असतो. त्याहि सातच असून त्यांच्यांतहि आठवा म्हसोबा असतोंच. या आठ मावल्या (माऊली = माता = मातृका) गांवोगांवीं असतात. या मात्र वस्ती जवळ आणि पाण्यापासून दूर असतात. यांचें सुद्धां नैवेद्यादी प्रकार आसरांप्रमाणेंच असतात. विवाहोपनयनादि मंगल कार्यारंभीं मातृका पूजन या नांवाच्या विधी असतो. जल मातृका स्थल मातृका अशा अनेक प्रकारच्या मातृकांचे अस्तित्व आपल्या कर्मकांडाच्या वाङ्मयांत आढळते. उपरोक्त मावल्याची पूजा सर्व गांव प्रसंगोपात करतो. विशेषतः श्रावणांत आणि कॉलरा होण्याचा कळांत दर मंगळवारीं यांची पूजा होते. यांना निरनिराळीं नांवें असतात. त्यांत आनंदा, जरी व मरी ही विशेष प्रसिद्ध आहेत. आनंदा म्हणजे आनंद देणारीं. जरी म्हणजे वार्धक्य आणणारी. आणि मरी म्हणजे मृत्यू आणणारी. काल्यानें कहर केला तर मरीचा वारा आला म्हणतात. आणि मरीवर पाण्याच्या घागरी आणून ओततात, व मरीला थंड करतात. या मावल्या पुरुष भगतांच्या अंगांत फार येतात. या सात मावल्या उर्फ मातृकांच्या दगडाच्या शेंदूर फासलेल्या गोट्याच्या स्वरुपाच्या किंवा मूर्तीही काढलेल्या असतात. मुंबईच्या प्रिन्स

आल्बर्ट म्युझीयममधें मातृका खोदलेला एक दगड आणून ठेवलेला आहे. त्यांत या सप्त मातृकांतील शेवटच्या जरी आणि मरी यांचें स्वरूप अगदीं जरा आणि मरण यांचें द्योतक असें यथार्थ दाखविलेले आहे. उप-रोक्त दगड हा म्हैसूर कडून आलेला असावा असें स्मरतें.

द्राविड प्रदेशांतहि असें मातृका पूजन प्रचलित आहे. आणि अगदीं ढोबळ साम्य या आसरा व उषा यांत दिसतें. सूर्य आणि उषा तसा म्हसोबा आणि आसरा यांचा संबंध आहे. शेंदूर आणि प्रातःकाळीन तांबडे तेज यांचें साम्य असून जलाशयांतून असणारें स्थान हें सूर्य व उषा या समुद्रांतून वर येतात या वेदांत येणाऱ्या कल्पनांचें प्रचलीत प्रत्यंतर आहे. महालक्ष्म्याहि नदीवरूनच येतात, हें पहाण्यासारखें आहे इतकेंच नव्हे तर हिंदूंत सर्व देवदेवतांचें विसर्जन जलाशयांत करण्याच्या मुळाशीं सूर्य, उषा, तारे, ग्रह, समुद्रांतून वर येतात व समुद्रांतच अंतर्धान पावतात हा प्राचीनतम वैदिक अनुभव असावा असेंहि म्हणावेसे वाटतें.

१५ कानबाईचा कुळाचार :—

हा कुळाचार अगदीं सोळाआणे खानदेशी म्हणून दाखवता येणाऱ्यांत एक प्रमुख आहे. खानदेशांतील सर्व स्पृश्य लोकांत व चांभारांत सुद्धां हा सण प्रचलित

आहे. भील मात्र याला अपवाद होत. ब्राह्मणांत सुद्धां ऋग्वेदी ब्राह्मणांतहि हा कुळाचार शिरलेला आहे. स्थानिक ब्राह्मणांत तर हा घरोघरीं आहेच. दर श्रावणांतील पहिल्या किंवा नंतरच्या रविवारीं प्रत्येकाच्या घरांत जीं रणादेवीच्या लग्नांत परणलेली नारळें असतात त्यांतील एक किंवा दोघांची शोडषोपचारें पूजा करून एका चौरंगावर मखर सजवून देवी म्हणून प्राणप्रतिष्ठा करतात. कांहीं लोक शक्य तर फूट दोन फूट उंचीची लाकडाची मूर्ती बनवून दागिन्यांनीं खूप सजवतात. सबंध रात्रभर गाणें, खेळ करून जागरण करतात व सकाळीं त्या देवीचें जलशयांत विसर्जन करतात तीं नारळें विसर्जनाच्या वेळीं फेकून न देतां धुऊन परत घरीं आणून ठेवतात.

या देवीच्या नांवानें कुटुंबाच्या मानानें अडीच शेर, पांच शेर असे गहू घेऊन ते घरींच शुचिर्भूत होऊन दळून त्याच्या पुरणाच्या पोळ्या करतात. व उरले तर ते संपेपर्यंत साध्या पोळ्या करून खातात. यांनाच रोट म्हणतात. हे रोट तुरीच्या वरणाशी खात नाहींत त्यांचें पीठ गाळणीनें गाळत नाहींत. तसेंच आपल्या कुळाखेरीज अन्य माणसाला खाऊं देत नाहींत. सर्व घराण्यांत लग्न न झालेल्या व कांहीत लग्न झालेल्या मुलीसुद्धां हा खाऊ शकतात. परंतु मुलीची संतती हा

रोट खाऊ शकत नाहीं. रोट संपेपर्यंत उसनेंपासणें देणें व धर्मादाय बंद असतो.

१६ रणा देवीचें लग्नः—

हा कानबाईचा वार्षिक कुळाचार एका दुसऱ्या मोठ्या कुळाचारावर आधारलेला आहे. या कानबाई-साठीं जीं नारळें लागतात तीं परणलेलीं म्हणजे लग्न झालेलीं असावी लागतात. या नारळांचे लग्न रणादेवीच्या लग्नांत लागतें. आणि रणादेवीचें लग्न ही एक मोठी प्राचीन परंपरेची आणि सामाजिक व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची गोष्ट आहे. ब्राह्मण, मराठे, सोनार, धनगर, माळी वगैरे बहुतेक प्रतिष्ठित घराण्यांत हा रणादेवीच्या लग्नाचा प्रघात असतो. तो फारच खर्चाचा असल्यानें मोठा मान्यतेचा गणला जातो. आणि या लग्नासाठीं तें करणाऱ्या कुटुंबाला जरी मोठा खर्च करावा लागला तरी त्यामुळें कित्येक गरीब लोकांना पाव आण्याचाही खर्च न करावा लागता लग्न करून घेण्याची संधी मिळते.

लग्न किंवा मुंजीच्या तिथीच्या आधीं येणाऱ्या रविवारीं रणादेवीची स्थापना करतात. त्या दिवशीं कुंभाराकडून माठ, चूल, सुताराकडून घडवंच्या, दिवठाण्या, बुरुडाकडून पाट्या, सुपल्या वगैरे साहित्य वाजत गाजत घरीं आणतात. नंतर शेतांत जाऊन एका

आंब्याच्या झाडाखालून काळीमाती व एक दिवा लावून आणतात. घरीं येऊन घरांतील परंपरेच्या रणादेवीच्या पूजेच्या नारळाची कलशांवर स्थापना करून त्यांच्यापुढें काळ्या मातीवर सात प्रकारचें धान्य पेरतात. वाजत गाजत आणलेल्या त्या मातीला कस्तुरी म्हणतात. देवीच्या पुढें एक दीप रात्रंदिवस तेवत असतो. सात दिवस पर्यंत सकाळ संध्याकाळ वाजंत्री वाजते. पुरणा-वरणाचा सैंपाक होतो. व शेवटच्या रविवारीं सूर्याचा मातीच्या घोड्यावर बसलेला पुतळा करून त्याच्याशीं रणादेवीचें लग्न लागतें. या रणादेवीच्या लग्नाचा विधी अगदीं आपल्या नेहमींच्या विवाहाप्रमाणेंच असतो. यांत वधुवरांचा गोत्रोच्चार खालील प्रमाणे होतो.

वरः— काश्यप गोत्रोत्पन्नस्य काश्यप वत्सहरण नैधृति त्रिप्रवरान्वितस्य अर्चिशर्मणः प्रपौत्राय मर्चिशर्मणः पौत्राय कश्यप शर्मणः पुत्राय सूर्यशर्मणे वराय.

वधूः— अगस्तिगोत्रोत्पन्नस्य अगस्ति दाढ्याच्युतांबुवाह त्रिप्रवरान्वितस्य धातृशर्मणः प्रपौत्रीं विधातृशर्मणः पौत्रीं त्वष्टुशमर्णः पुत्रीं रन्नासन्नादेवी नाम्नी कन्यां यथाशक्त्या सालंकृता राणादेवी संप्रददे ।

ज्या वेळीं रणादेवीचें लग्न लागते त्या वेळीं आणि त्याच मांडवाखालीं नवसाची किंवा कुळाचार म्हणून

पांचपंचवीस लग्नें लागतात. धनगर, माळी, मराठे, शिंपी, सोनार वगैरे समाजांतील कित्येक वधूवर त्या मांडवांत येऊन बसतात आणि रणादेवीच्या लग्नाची टाळी लागते त्यावेळीं आपल्या वधूवरांची टाळी लावतात. त्यांना भट-जीला दोन चार पैसे दक्षणा देण्यापेक्षां कांहीं निराळा खर्च करावा लागत नाहीं. आणि नेहमीच्या लग्नाच्या पंक्ती, वाजंत्री मिरवणूकी वगैरे सर्व बाबींना फाटा देता येतो.

या रणादेवीच्या लग्नाच्या संधीलाच त्या देवीच्या जवळ अनेक नारळांच्या जोड्या कचेसूत गुंडाळून ठेव-तात आणि भावना अशी असते कीं तीं नारळेंही परणली जात असून त्यांचा उपयोग पुढें कानबाईच्या पूजे साठीं करावयाचा असतो. विभक्तपणामुळें फूटून निघालेल्या नव्या कुटुंबाला कानबाईच्या स्थापनेसाठीं अशा नारळांची गरज असते. कधीं कधीं नेहमीचे कानबाईचे नारळ गहाळ झाले किंवा फुटलें तर त्यांच्या जागीं असें परणलेलें नारळ आणावें लागतात. स्थापनेनंतरच्या दुसऱ्या सोम-वारीं रणादेवीची बोळवण करतात.

१७ रणादेवी म्हणजे ऋगवेदांतील सरण्यू :—

उपरोक्त रणादेवी ही त्वष्ट्याची मुलगी असल्याचें वर आलेच आहे. ऋग्वेद दशममडलांत अनेक विवाह आलेले आहेत. त्यांत सूक्त १७ ऋचा १,२ यांत

सरण्यूचा सवित्याशी विवाह वर्णिला आहे. त्यांत त्वष्टा आपली कन्या सरण्यू ही सवित्याला देतो असें म्हटलें आहे.

रत्नासन्ना हें नांव भट मत्रांत उच्चारत असले तरी सामान्य जनसमूहांत 'रणादेवी' हें नांवच प्रख्यात आहे. सरण्यू यांतील प्रथम रचा लोप होऊन रणादेवी बनलेलें दिसते. कानबाई राणबाई किंवा राणूबाई असें ही कांहीं लोक म्हणतात. म्हणजे रणादेवीच्या लग्नांतील वधूवर हे निःसंशय ऋग्वेदांतील सरण्यू आणि सविताच होत याची खात्री पटते.

वेदमंत्रांचें अध्ययन व यज्ञसंस्थेची जोपासना करणाऱ्यांना वैदिक संस्कृतिच्या संरक्षणाचें श्रेय आहे तसेंच वेदांतर्गत कल्पनावर ज्यांचें कुळाचार अधिष्टित आहेत त्या लोकानांहीं त्या संस्कृतीच्या संरक्षणाचें श्रेय द्यावयास पाहिजे

खानदेशी कानबाई आणि तिची प्राचीन परंपरा लक्षांत घेतली तर तिच्या जोडीचे फार थोडे कुळाचार इतरत्र आढळतील. महाराष्ट्रांत मूक रविवार करण्याचें एक व्रत आहे. त्या दिवशीं आदित्य राणूबाईची कथा सांगतात. या कथेच्या तपशिलांत विशेष कांहीं नसले तरी सकृद्दर्शनीं आदित्य आणि राणूबाईचें हें जोडपे वैदिक आदित्य आणि सरण्यूच असावें असें वाटतें.

१८ अहिरांत कारुनारुंचा भरणाः—

अहिर नांव धारण करणाऱ्या जातींची मोजणी केली तर त्यांत कारुनारुंचाच भरणा विशेष दिसतो. गांवांत मराठे रजपूत या सारखे लोक जमीनदार म्हणवतात. आणि सुतार, लोहार, कुंभार, न्हावी या सारखे लोक कारू नारू म्हणवतात. कारू म्हणजे कारागीर आणि नारू हाहि पण त्याचा समानार्थीच शब्द दिसतो. म्हणजे अहीर जातींनीं कारागीरी व कलांचा विशेष अभ्यास केलेला दिसतो.

अहीरांत शस्त्रधारी व शासक म्हणजे गांवो-गावच्या पाटील, देशमुख जहागीरदार, जमीनदार, अशा जाती नसाव्यांत ही एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. धनगर व गवळी कांहीं आपवादात्मक पाटील असेल तरी सर्व सामान्य नियम म्हणून अहीर जाती कारागीर व पशुपालच आहेत

हिंदुस्थानांतील जातींच्या इतिहासाच्या दृष्टीनें ही गोष्ट विशेष विचार करण्यासारखी आहे. तथापि येवढें मात्र म्हणावेसे वाटते कीं आर्यांच्या भिन्नभिन्न शाखांच्या परस्पर जितजेतेपणाच्या संबंधांचा परिणाम म्हणून या जातींना कायमचे कारागीर करण्यांत आले असावे कीं काय असा विचार डोकावू लागतो.

गुजराथेंत ब्रह्मभट्ट म्हणून ठाकुरांची जात आहे. हे भाट, बारोट म्हणवतात, भाट म्हणजे भट्ट, बारोट हा पुरोत = पुरोहित असा मूळ शब्द दिसतो. या ब्रह्म-भट्टाच्या नांवांत ब्रह्म या पदानेंहीं ब्राह्मणाचें अस्तित्व दर्शविलें जातें. परंतु आज हीं जात सर्व राजे रजवा-ड्यांच्या दरबारांत फक्त स्तुतिपाठकाचें काम करते. यांना ब्राह्मणांच्या खालोखाल मान असतो व तीर्थावरच्या कुलोपाध्याया प्रमाणें हे राजेरजवाडे रजपूत वगैरे जातीचे वहिवंचेही असतात. म्हणजे सालोसाल फिरून त्यांच्या यजमानांच्या घराण्यांत होणाऱ्या जननमरण विवाहाच्या नोंदी घेत फिरतात.

या ब्राह्मण दिसणाऱ्या जातीनें बंदीजना प्रमाणें स्तुति पाठकाचा धंदा घेण्याच्या बुडाशी कधीतरी एकाद्या प्रबल क्षत्रिय जातीनें दिलेला पराभव असला पाहिजे आणि यांच्या कपाळी त्यामुळें सदैव स्तुति करणें लागले असावे असें दिसते.

१९ आहिरा गाडी:—

खानदेशातील वाहनांत एक विशेष वैशिष्ट्य असें कीं त्यांत एक अहिरा गाडी किंवा नुसता आहेरा या नांवानें ओळखला जाणारा गाडीचा प्रकार असतो. त्यांत गाडीच्या दांड्याकाच मागें पुढें लांबवून त्यावर आडवी

लाकडे ठेऊन गाडीच्या साटीचें काम केलेलें असते. निराळी साटी असत नाहीं. अशा तऱ्हेचे गाडे नेमाड व माळव्यांत व संयुक्त प्रातांत असतात. परंतु त्या गाड्याचे आहेरा हे नांव विशेष महत्वाचें आहे. या गाड्यांचा उपयोग माल वाहतुकी साठींच होतो.

दुसरें वैशिष्ट्य असें की, घोड्याचा तांगा हा खानदेशांत विशेष सोइस्कर असतो. तो शहरीं टांग्या-प्रमाणें फक्त सडकेवर किंवा सडकेसारख्या सपाट रस्त्या-नेंच चालतो असें नव्हे तर सामान्य माल वाहतुकीच्या गाड्या ज्या गाडवाटेनें जातात त्या गाडवाटेनेंही तो जातो आणि त्याचा वेग तासी पांच दहा मैल सहजच असतो त्याला कमानी नसतात आणि घोड्याचे खोगीर हे विशिष्ट असें मानेवर जू ठेवण्याचे असतात.

२० स्त्रियांचा सकच्छ वेषः—

अहिरसमाजांत स्त्रियांची लुकडी नेसण्याची रीत कासोटा घेण्याची असते. उलट खानदेशी मराठे व रजपूत यांच्या स्त्रिया कासोटा घालीत नाहींत. हा एक मोठा ठळक भेद स्त्रियांच्या वेषांत आहे. तसेंच पडदा पद्धत बहुतेक नसतेच.

कासोट्याची परंपरा ही या लोकांनीं सुद्धां मागून उचलली असावी असें वाटतें. ब्राह्मणांत स्त्रिया कासोटा

घालत असल्या तरी विवाहाचें वेळीं वधूनें विकच्छ असण्याची चाल ब्राह्मणांत आजही आहे. त्या प्रमाणेंच लग्नाचें वेळीं या लोकांतील वधूहि विकच्छच असतात.

खानदेशांत येऊन राहिलेले गुजर व गुजराथी लोहार वगैरे लोकांत स्त्रिया नेहमीं कासोटा घेत असल्या तरी घरांत एकादा मृत्यू घडला तर त्याच्या अशौचांत कासोटा घेत नाहींत. तसाच हा प्रकार दिसतो.

२१ लग्न व मूहूर्त : — विवाहाला व्यवहारांत लग्न म्हणतात. यांत लग्न ही ज्योतिषाची संज्ञा आहे तशीच खानदेशांत पुनर्विवाहाला मव्हतीर म्हणजे मूहूर्त ही संज्ञा आहे. विवाह हा सुमुहूर्तावरच करावयाचा असतो व एकादेवेळीं लग्नालाच मव्हतीर [किंवा गांवढळ मराठींत म्होतुर] म्हटले असते तर साजलें असतें. परंतु परंपरा पुनर्विवाहाला मव्हतीर म्हणजे मुहूर्त म्हणते. यावरून प्रारंभीं स्त्रियांच्या पहिल्या व पुनर्विवाहांत कांहीं भेद मानला जात नसावा असें दिसतें.

सांप्रत हव्यकव्यांत पुनर्विवाहित स्त्रियांना नवऱ्याचे बरोबरीनें भाग घेता येत नाहीं. म्हणजे विवाह, सत्यनारायणादि मंगल कार्यांत पुनर्विवाहित स्त्रियांना पतीबरोबर देव प्रतिष्ठा पूजा वगैरे धार्मिकविधींत भाग घेण्याची चाल नाहीं. आदर्श जीवनाच्या उपासनेंत

कालांतरानें पुनर्विवाहाकडे कमीपणा कसा आला याचें हें उत्तम उदाहरण आहे. सर्व अहीर–उपपदधारी जातींत पुनार्विवाह व काडीमोड प्रचलीत आहे. श्री. चांदोरकर यांनी अहीर विधवा सख्खा धाकटा दीर किंवा चुलत दीर नाहींतर आतेभाऊ अथवा मावसभाऊ किंवा शेवटीं जातींतील कोणीहि मनुष्य अशा क्रमानें मोतूर लावते म्हणून म्हटलें आहे हें खानदेशांतील अहीर जातींत मुळींच आढळत नाहीं. नवऱ्याच्या नात्यांत पुनर्विवाह लावण्याची कल्पनाच खानदेशांतील अहीरनांव धारण करणाऱ्या जातींत किळसवाणी समजतात. उलट खानदेशांतील पंचाळ, वंजारी (लमाण) व पारधी वगैरे जातींत तसा रिवाज आढळून येतो. अर्थात अशी चाल खानदेशा बाहेर जे केवळ मेंढपाळच राहिलेले अहीर असतील त्यांतच असेल.

—: उपसंहार :—

येथपर्यंत खानदेशांत वैशिष्ट्यानें आढळणाऱ्या अहिराणी भाषा व संस्कृति यांचा संक्षेपतः परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांतून मला खालील गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणावयाच्या आहेत.

(१) अहीर ही आर्यवर्गांतील एक प्राचीन जाति असून तिचा पशुपालनाचा पेशा इतर आर्यशाखा शेती

भाति करून स्थिर झाल्यावर बऱ्याच काळानंतर सुटला असावा.

(२) ही आभीर जात खानदेशांत स्थिर होऊन तिनें शेती वगैरे व्यवसाय करण्यास खानदेशांतच विशेष लक्ष दिले असावें. व खानदेशांतच समाजाला उपयुक्त कलांचा अभ्यास करण्याची संधी आणि पाळी या जातीच्या लोकांस आली असावी.

(३) अहिरांच्या फक्त कारुनारूंच्या स्वरुपाच्या जाती रहाण्यांत आणि जमीनदार किंवा शस्त्रजीवी वर्ग त्यांतून नष्ट होणाऱ्या मुळांशीं खानदेशांतील अहीर जातीवर मागून येणाऱ्या एकाद्या लढाऊ जातीनें विजय व वर्चस्व मिळविलें असावें. खंडोबाची दुसरी स्त्री बानाई ही धनगर होती म्हणतात. रजपूत राजांत अन्य जातीची स्त्री करतात. तिचें खांड्याशी म्हणजे तलवारीशीं लग्न लावतात व तिला खांडाराणी म्हणतात.

(४) श्री. चांदोरकर म्हणतात त्याप्रमाणें खान–देशांती अहीर जाती या मिश्र जाती नसून एका अहीर जातीच्या पोट जाती दिसतात. मिश्र जातीचा दर्जा समाजांत कमी समजून त्याच्याशी तुल्य जाती अन्नोदक व्यवहार करीत नाहींत. अहीर सोनार, शिंपी, हें

स्वतःला मराठे रजपुतांपेक्षां कांहींसे वर समजतात तर अहीर धनगर, सुतार, न्हावी, लोहार, गुरव वगैरे जातींचा मराठेरजपुतांशीं अन्न व्यवहार चालतो. उलट मराठेरजपुतांत हिणकस समजले जाणारे, आकरमासे, लेकवळे व काकापुरी यांचा मुख्य जातीशी तेवढाहि संबंध नसतो.

(५) अहिराणी भाषा ही आर्य वर्गांतील एका टोळीची संस्कृतपूर्व अशी परंपरागत चालत आलेली व अर्थातच स्थलकाल परिस्थितीचा कमी अधीक संस्कार झालेली भाषा दिसते. ती मराठीची पोट भाषा नाहीं आणि गुजराथीची तर नाहींच नाहीं.

(६) अहीर हा शब्द संस्कृत अहिस् पासून झाला असावा ही कल्पना प्रस्तुत लेखकास ग्राह्य वाटते. म्हणजे भारतवर्षांत नाग म्हणून एकेकाळीं गाजलेली ही अहीर जात दिसते. ही संस्कृतीनें तुल्यबल असल्यानेंच वैदिक आर्यांत समरस होऊं शकली. बहिस् पासून बाहेर किंवा संस्कृत षष्टीच्या कांहीं शब्दांना लागणाऱ्या एस्चें एर व अर असें अनुक्रमें बंगाली आणि मारवाडींत सर्रास प्रत्यय झालें आहेत. संस्कृतांत विवक्षित संधींत स् चा र होतो तर प्राकृत भाषांत कांहीं शब्दांत शेवटच्या स्‌चा कायमचा र होतो याचें हें उदाहरण

'अंतर' व 'बाहेर' प्रमाणें दिसतें.

(७) वेदमंत्रांची जोपासना करणाऱ्या मांत्रसंस्कृतीच्या लोकांच्या संस्कृति, भाषा, वंश या दृष्टीनें त्यांच्याशी एक असणाऱ्या परंतु केवळ वेदमंत्रांच्या गोपनामुळें विवक्षित वर्तुळा बाहेर पडलेल्या अशा जातीपैकीं अहीर ही जात 'असावी असा त्यांच्या कुळाचारांचा व आचारविचारांचा विचार करतांना ग्रह होतो.

आणि या दृष्टीने विचार केला तर इंद्रवृत्र युद्ध हें किंवा महाभारतांतील सर्पसत्र यांत अहिरावर झालेल्या हल्लयांचें चित्र डोळ्यापुढें उभें रहाते. वृत्राला वेदांत अहिः म्हटले आहे.

माझें निष्कर्ष चुकीच वाटल्यास ते दुरस्त करण्याच्या हेतूनें किंवा इष्ट वाटल्यास पुष्ट करण्यासाठीं संशोधकांचें या भाषा व संस्कृतींच्या अधीक अभ्यासाकडे लक्ष वळल्यास माझे श्रम सफळ होतील.

समाप्त

स्थूल सूचि

(यांतील अंक पृष्ठाचे आहेत.)

भा. रं. कुळकर्णी बी. ए. यांचीं पुस्तकें.

(१) आजच्या हिंदूजीवनांतील धुवदर्शीचे अवशेष

हें पुस्तक लो. टिळकांच्या ध्रुवसिद्धांताचे समर्थन करणारे आहे. हें राजवाडे सं. मंडळ धुळें या संस्थेनें प्रकाशीत केलें असून त्यालेच दरबारनें या स बक्षीस दिले आहे. तसेंच लो. ना. अणे, रा. सा. चापेकर, सरदार किबे, रियासतकार सरदेसाई, आहिताग्निराजवाडे श्री० केवलानंद सरस्वती, श्री. वाकसकर आणि पं. कोकजे इत्यादि विद्वानांचे चांगले अभिप्राय मिळाले आहेत.

(२) वेदांग ज्योतिषांतील लग्नविचार (लवकरच प्रकाशित होईल) या विषयावर महामहोपा. सुधाकर द्विवेदी लो. टिळक कै. शं. बा. दीक्षित व महामहोपाध्याय डॉ. आर. शामशास्त्री यांनी परिश्रम केलेलें असून त्यांत महत्वाची भर घालण्याच श्रेय या पुस्तकानें घेतले आहे.

(३) खानदेश म्हणजे स्कंददेश (लवकरच प्रसिद्ध होईल) खानदेशाच्या भिन्न भिन्न पंधरा नावांचा प्रपंच यांत केलेला असून खानदेश शब्दाची अर्वाची नवी परंतु प्राचीन आणि साधार व्युत्पत्ति यात प्रतिपादन केलेली आहे. हें पुस्तक म्हणजे खानदेश शब्दाचे मूळ हुडकण्या करतां आता पर्यंत झालेल्या प्रयत्नांचा एक इतिहासच होय.